रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १८ ◆ अंक २१२
www.ramprahar.com

◆ बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

एसटीच्या सुरक्षेला आता डिजिटल कवच/२
कशेणे येथे कालवा फुटून शेती पाण्यात/५
वर्ल्डकपमध्ये भारताचा सामना आज नेदरलँड्सविरुद्ध/८

## भारत-फ्रान्समध्ये जागतिक धोरणात्मक भागीदारी



**मुंबई :** भारताच्या संरक्षण सिद्धतेसाठी मंगळवारचा (दि.१७) दिवस ऐतिहासिक ठरला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची मुंबईतील लोकभवन येथे महत्त्वाची भेट झाली. या भेटीत दोन्ही देशांच्या मैत्रीचे नवे पर्व सुरू झाले असून तब्बल ११४ राफेल फायटर जेट्स आणि शक्तिशाली हॅमर मिसाईलच्या खरेदीवर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. विशेष म्हणजे आता हे राफेल विमान भारतातच तयार होणार आहे. द्विपक्षीय बैठकीनंतर दोन्ही नेत्यांनी कर्नाटकातील वेमगल येथे उभारण्यात आलेल्या टाटा-एअरबसच्या (एच १२५) लाइट युटिलिटी हेलिकॉप्टरच्या फायनल असेंबली लाइनचे दूरदृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन केले. भारत आणि फ्रान्समधील ही धोरणात्मक भागीदारी आशिया-प्रशांत क्षेत्रातील सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

### माझी वसुंधरा अभियान ५.०

# पनवेल महापालिका राज्यात अव्वल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या माझी वसुंधरा अभियान ५.०मध्ये तीन लाख ते दहा लाख लोकसंख्येच्या अमृत शहरे गटात पनवेल महानगरपालिकेने राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. सात कोटींचे बक्षीस महापालिकेस प्राप्त होणार आहे. या यशाबद्दल महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे यांनी आनंद व्यक्त केला आहे.

माझी वसुंधरा अभियानामध्ये पनवेल महापालिकेने सलग दुसऱ्यांदा राज्यात प्रथम क्रमांकाचे सातत्य राखले आहे. २१ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार आणि पर्यावरण व वातावरणीय बदलमंत्री पंकजा मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये माझी वसुंधरा ५.० हरित सन्मान सोहळा होणार आहे. हा सन्मान म्हणजे पनवेलच्या पर्यावरण संरक्षण आणि समृद्धीसाठी करण्यात आलेल्या कार्याची पावती आहे.

पनवेल शहरातील पर्यावरण संरक्षण आणि प्रदूषण नियंत्रणबाबत नागरिकांची जाणीव, शिस्तबद्धता आणि महापालिकेच्या सततच्या प्रयत्नांचे फलित आहे. उपायुक्त स्वरूप खारगे, डॉ. वैभव विधाते, विभाग प्रमुख मनोज चव्हाण, पर्यावरण विभागाचे प्रवीण व्हळगळ, स्वप्नील कांबळे, कविता साळवे तसेच मुख्य आरोग्य निरीक्षक, महापालिका अभियंता, सर्व स्वच्छता निरीक्षक आणि माझी वसुंधरा अभियानाचे सल्लागार अयुफ अकुला, युवराज झुरंगे यांच्या टीमने संपूर्ण या अभियानासाठी विशेष नियोजन, मार्गदर्शन आणि अंमलबजावणी करीत मेहनत घेतली.

माझी वसुंधरा अभियान ५.० अंमलबजावणीवेळी शहरातील विविध पर्यावरणपूरक उपक्रम, जनजागृती मोहिमा, अभियांनमध्ये नागरिकांचा सहभाग आणि पर्यावरण संरक्षण आणि समृद्धीसाठी तांत्रिक व व्यवहार्य उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या. यामुळेच पनवेल शहर हे पर्यावरण संरक्षण आणि समृद्धीच्या बाबतीत एक आदर्श मॉडेल ठरले आहे.

पनवेल महापालिका यशाची शिडी चढत असताना ही फक्त सुरुवात असून स्वच्छ, पर्यावरणपूरक व आरोग्यदायी शहर निर्मितीसाठी प्रयत्न सुरूच राहणार असल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले. लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या सहभागामुळे हे यश शक्य झाले असून पुढील काळातही महापालिका अशाच प्रकारे पर्यावरण संरक्षण आणि प्रदूषण नियंत्रणबाबत उत्कृष्टता सिद्ध करत राहील, असे पर्यावरण विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांनी सांगितले.




### मोलाचे मार्गदर्शन अन् नागरी सहभाग

या यशामध्ये पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले तसेच या यशात नागरिकांचा सहभागदेखील तितकाच मोलाचा ठरला आहे. शहरातील विविध पर्यावरणपूरक उपक्रम, पर्यावरणविषयक जनजागृती मोहिमा, अभियानांमध्ये लोकप्रतिनिधी व नागरिकांचे प्रशासनास सहकार्य यामुळेच ही संपूर्ण प्रक्रिया यशस्वी झाली आहे. महानगरपालिका भविष्यातही स्वच्छ, हरित आणि पर्यावरणपूरक शहर उभारण्याच्या दिशेने कार्यरत राहणार आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त ७५ अभंगांचे व्हिडीओ चित्रिकरण



**तळोजा : रामप्रहर वृत्त**

थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त नादब्रह्म साधना मंडळाच्या वतीने ७५ अभंगांचे भव्य व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ सद्गुरू वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या तळोजा मजकूर, योगीनगर (धोंडळी) येथील दत्त मंदिरात लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाला.

या कार्यक्रमास भजनसम्राट हभप निवृत्तीबुवा चौधरी, नादब्रह्म साधना मंडळाचे अध्यक्ष वसंतबुवा पाटील, शास्त्रीय गायक उमेश चौधरी, नगरसेवक नितेश पाटील, माजी सरपंच संतोष पाटील, विनोद पाटील, अशोक पाटील, राम पाटील, विलास खानावकर, कैवारी पाटील यांच्यासह मंडळाचा शिष्य परिवार उपस्थित होता.

### नादब्रह्म साधना मंडळाचा उपक्रम

या विशेष उपक्रमांतर्गत एकूण ७५ अभंगांचे ध्वनीमुद्रण व व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येत आहे. रेकॉर्डिंगवेळी निवृत्तीबुवा चौधरी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबांच्या अमृत महोत्सवानिमित्त हा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक ठेवा समाजाला अर्पण केला जात आहे. हे अभंग केवळ एका वर्षापुरते मर्यादित नसून पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या अभंगांची रचना व सादरीकरण विविध अनवट आणि पारंपरिक रागांवर आधारित चालींमध्ये करण्यात आले आहे. त्यामुळे नवोदित विद्यार्थी, शिष्यवर्ग आणि संगीत अभ्यासकांना रागांची शास्त्रशुद्ध व सुसूत्र ओळख होण्यास मोठी मदत होणार आहे. भारतीय शास्त्रीय संगीताच्या परंपरेतील रागसंवर्धन आणि सातत्यपूर्ण जतन हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचेही नमूद करण्यात आले.

या उपक्रमामुळे भक्ती, संगीत आणि संस्कार यांचा सुंदर संगम अनुभवता येणार आहे. लवकरच हे सर्व अभंग सर्व रसिक श्रोत्यांसाठी खुले करण्यात येणार असून त्यांचे अधिकृत प्रकाशनही केले जाणार आहे. या उपक्रमामुळे अमृत महोत्सव वर्षाला आणखी एक सांस्कृतिक व आध्यात्मिक अधोरेखा लाभली आहे.

## निवडक

### स्व. अजित पवारांच्या अपघाताची सीबीआय चौकशीची मागणी

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची सीबीआयमार्फत चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांनी मंगळवारी (दि. १७) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या वेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, युवा नेते पार्थ पवार उपस्थित होते.

### भारतीय मुलगीही एपस्टीनची बळी; नव्या फाईलमध्ये खुलासा

**न्यूयॉर्क :** अमेरिकेच्या न्याय विभागाने प्रसिद्ध केलेल्या जेफ्री एपस्टीनच्या नव्या फाईल्समध्ये एका भारतीय मुलीचा उल्लेख आला आहे. या संदर्भात काही पीडितांची केस लढणाऱ्या महिला वकिलाने अमेरिकेच्या अधिकाऱ्यांना १३ जानेवारी २०२० रोजी ई-मेल केला असून यावरील उत्तरात अधिकाऱ्यांनी मुलीला शोधून तिला न्याय आणि भरपाई देऊ, असे म्हटले आहे.

## रयत सेवक को-ऑप बँकेच्या वाशी शाखेला पदाधिकाऱ्यांची सदिच्छा भेट



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दि रयत सेवक को-ऑप बँक लि. सातारा अंतर्गत वाशी (नवी मुंबई) येथील शाखेला रयत शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी (दि. १६) सदिच्छा भेट दिली.

रयत शिक्षण संस्थेची संलग्न असलेली दि रयत सेवक को-ऑप बँक लि. सातारा ही सहकार क्षेत्रातील अग्रगण्य व विश्वासार्ह बँक म्हणून ओळखली जाते. राज्यभर कार्यक्षेत्र असलेल्या या बँकेच्या एकूण २० शाखा असून सुमारे २८०० कोटी रुपयांचे व्यवहार बँकेमार्फत होत आहेत.

या भेटीदरम्यान संस्थेचे व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे, सचिव विकास देशमुख, मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बँकेच्या कामकाजाची सविस्तर माहिती घेतली व समाधान व्यक्त केले.

बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील यांनी संस्थेच्या मान्यवरांचे स्वागत केले. या वेळी वाशी शाखाधिकारी शैलेश कांबळे, ऑफिसर राहुल मिरगे, किरण नलावडे, दत्ता महाडिक तसेच इतर बँक कर्मचारी उपस्थित होते.

## अखेर हर्षवर्धन सपकाळांना उपरती!

### शिवप्रेमींप्रती व्यक्त केली दिलगिरी

**मुंबई :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना करून नव्या वादाला तोंड फोडले होते. अनेक पक्षातील राजकीय मंडळींनी सपकाळ यांच्यावर टीका केली. त्यानंतर अखेर मंगळवारी (दि. १७) सपकाळ यांनी फेसबुक पोस्टवरून दिलगिरी व्यक्त केली आहे.



मालेगाव महापालिकेतील उपमहापौरांच्या दालनात टिपू सुलतानचा फोटो लावल्याने संताप व्यक्त होत असताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी थेट टिपू सुलतान आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना केली होती. त्यामुळे वाद पेटला. त्यावर सपकाळ यांनी, माझ्या वक्तव्यामुळे काही शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या गेल्या, त्याबद्दल मी मनःपूर्वक खेद व्यक्त करतो. कोणाच्याही भावनांना ठेच पोहचवण्याचा माझा हेतू नव्हता. शिवजयंती दोन दिवसांवर आली आहे. आपण सर्वांनी गैरसमज दूर ठेवूया ही नम्र विनंती, असे आता म्हटले आहे.

## मुंबईच्या समुद्रात धावणार वॉटर मेट्रो

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवरचा ताण कमी करण्यासाठी आता मेट्रोप्रमाणे जलवाहतुकीवर भर दिला जाणार आहे. कोचीच्या धर्तीवर मुंबईसह महानगरात वॉटर मेट्रो सुरू करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात डिसेंबर २०२६पर्यंत दोन मार्गिका प्रवाशांच्या सेवेत दाखल होतील, अशी घोषणा बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी मंगळवारी (दि. १७) मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत केली.

या वेळी बोलताना मंत्री नितेश राणे म्हणाले की, ज्याप्रमाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत मेट्रोचे जाळे यशस्वीपणे उभारले, त्याचप्रमाणे जलवाहतुकीचे जाळे निर्माण करणे हा आमचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. मागील दीड वर्षांपासून आम्ही या प्रकल्पावर काम करीत आहोत. मुंबई महानगरात एकूण सात ते आठ मार्ग निश्चित करण्यात आले असून प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल




(डीपीआर) अंतिम टप्प्यात आहे. या महिनाअखेरीस हा अहवाल प्राप्त झाल्यावर तो मुख्यमंत्र्यांकडे पाठवला जाईल.

मुंबईत जशी मेट्रो, लोकल, रिक्षा, टॅक्सी अशी प्रवासाची साधने आहेत, त्या प्रकारे आम्ही मुंबई वॉटर मेट्रो ही सुविधा मुंबईकरांच्या सेवेत आणत आहोत. त्यासाठी एकात्मिक तिकीट प्रणालीदेखील असेल. यापैकी दोन मार्गिका डिसेंबर २०२६पर्यंत सुरू करण्याचा मानस असल्याचे मंत्री राणे यांनी सांगितले. मुंबईकरांचा प्रवासाचा वेळ वाचवण्यासाठी आणि सुखकर प्रवासासाठी मुंबई वॉटर मेट्रो हा मैलाचा दगड ठरेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## महाडमध्ये वीरेश्वर महाराजांचा छबिना उत्सव

**महाड :** येथील आराध्य दैवत श्री वीरेश्वर महाराजांचा पारंपरिक छबिना उत्सवाचा शुभारंभ १३ फेब्रुवारीला गादी स्थापना व पेटी पूजनाने करण्यात आला होता. पुढे १५ रोजी महाशिवरात्रीनिमित्त महापूजा आणि १७ तारखेला देव भोजन आणि महाप्रसाद झाल्यानंतर बुधवारी (दि. १८) प्रमुख छबीना उत्सव साजरा करण्यात येत आहे. वीरेश्वर महाराजांना रायगड पोलीस दलाकडून मानवंदना दिली जाते. या उत्सवाला असंख्य भाविक आवर्जून उपस्थित राहतात. उत्सवाची सांगता १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ललीत कीर्तनाने होईल.

## पनवेलमध्ये आजपासून शिर्डीतील साईबाबांच्या पादुकांचा दर्शन सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील एच.एस. सद्गुरू श्री साई नारायणबाबा श्री साई मंदिर व श्री साईनारायणबाबा आश्रम येथे शिर्डीतील साईबाबांच्या पवित्र पादुकांचा दर्शन सोहळा १८ ते २० फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यामुळे पनवेल परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण होणार आहे.

१८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता श्री साईबाबांच्या पादुकांचे विधीवत स्वागत करण्यात येईल. त्यानंतर दुपारी १ ते रात्री ९ वाजेपर्यंत भाविकांना पादुकांचे दर्शन घेता येणार आहे. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत भव्य शोभायात्रा निघणार असून यात मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

१९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत अखंड दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. याच दिवशी भजन व महाप्रसाद होईल. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते १० वाजेपर्यंत पादुकांचे दर्शन घेता येईल. त्यानंतर श्री साईबाबांच्या पादुका शिर्डी मंदिराकडे प्रस्थान करतील.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून सोहळा यशस्वी करण्यासाठी मंदिर व समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत. पनवेल परिसरातील साईभक्तांनी या पवित्र दर्शन सोहळ्याचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केलेय.



# एसटीच्या सुरक्षेला डिजिटल कवच

## नवीन सीसीटीव्ही प्रकल्पातून प्रवाशांना मिळणार अभेद्य संरक्षण

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या कानाकोपर्‍यात धावणार्‍या 'लाल परी'च्या सुरक्षेला आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे बळ मिळणार आहे. दहशतवादी आणि समाजविघातक प्रवृत्तींच्या संभाव्य धोक्यांचा विचार करून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) एक महत्त्वाकांक्षी 'नवीन सीसीटीव्ही प्रकल्प' हाती घेतला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून एसटीच्या बसस्थानकांपासून ते विभागीय कार्यालयांपर्यंत सर्वच महत्त्वाच्या ठिकाणांवर डिजिटल नजरेचे अभेद्य जाळे उभारले जाणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पासाठी तब्बल १११ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीच्या सहाय्याने एसटीच्या बसस्थानके, आगार, विभागीय कार्यशाळा, मध्यवर्ती कार्यशाळा, विभागीय कार्यालये तसेच मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी यांसारख्या संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

एकूण ६३३ ठिकाणी तब्बल ७०३५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून, यामुळे एसटीच्या प्रत्येक हालचालीवर सतत डिजिटल नजर राहणार आहे. या अत्याधुनिक प्रकल्पाची जबाबदारी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निवडलेल्या टेलिकम्युनिकेशन कन्सल्टंट इंडिया लिमिटेड (ढउखड) या अनुभवी संस्थेकडे सोपविण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून प्रकल्पाची अंमलबजावणी वेगाने आणि प्रभावीपणे सुरू असून, या प्रकल्पाचा एकूण कालावधी १ वर्ष निश्चित करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा मुख्य कणा ठरणारे मध्यवर्ती नियंत्रण कक्ष मुंबई येथे उभारण्यात आले असून, त्याची वापरकर्ता स्वीकृती चाचणी (UAT) यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे. या नियंत्रण कक्षातून राज्यभरातील सीसीटीव्ही कॅमेर्‍यांवर केंद्रीकृत पद्धतीने लक्ष ठेवले जाणार आहे. त्यामुळे कोणतीही संशयास्पद हालचाल तात्काळ ओळखून आवश्यक ती कार्यवाही करता येणार आहे. प्रकल्पाच्या पायलट टप्प्यात मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर विभागातील ६४ महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही प्रणाली यशस्वीरित्या बसविण्यात आली आहे, ज्यामुळे सुरक्षेची नवी दिशा निश्चित झाली आहे. उर्वरित २७ विभाग, तसेच विविध कार्यशाळा आणि कार्यालयांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची पुढील कार्यवाही सध्या वेगाने सुरू आहे. या प्रकल्पामुळे एसटीच्या बसस्थानकांवर आणि कार्यालयांमध्ये सुरक्षिततेचे नवे पर्व सुरू होणार आहे. प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होणार असून, कोणत्याही अनुचित घटनांवर त्वरित नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे.

'नवीन सीसीटीव्ही प्रकल्प' हा केवळ कॅमेरे बसविण्याचा उपक्रम नसून, तो एसटीच्या सुरक्षेला डिजिटल कवच देणारा आणि प्रवाशांच्या विश्वासाला नवे बळ देणारा एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

यामुळे 'लालपरी' चा प्रवास आता केवळ वेगवानच नव्हे, तर अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि तंत्रज्ञानसज्ज होणार आहे. हीच या प्रकल्पाची खरी यशोगाथा ठरणार आहे. असे मत मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केले.

# शिवजयंतीनिमित्त पनवेलमध्ये भव्य मिरवणुकीसह विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसहभागातून व पनवेल महानगरपालिकेच्या वतीने येत्या गुरूवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त पनवेल शहरात भव्य मिरवणूकीचे व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका हद्दीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सकाळी ७.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यांस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार व श्रीफळ अर्पण करून भव्य मिरवणूकीस ढोल-ताशांच्या गजरात सकाळी ७.३० सुरूवात होईल. ही मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यापासून सुरू होऊन हुतात्मा स्मारक चौक, आदर्श लॉज, लाईन आळी, दि. बा. पाटील प्राथमिक शाळा, गावदेवी मंदिर, स्वा. सावरकर चौक, बापटवाडा चौक, महानगरपालिका कार्यालय,



सेवा योजना कार्यालय, बंदर रोड चौक, मौलाना आझाद चौक मार्गे टपाल नाका येथील अश्वारूढ पुतळ्यापर्यंत जाणार आहे.

या वर्षीच्या मिरवणूकीचे वैशिष्टय म्हणजे दरवर्षी पेक्षा यावर्षीच्या मिरवणूकीमध्ये चित्ररथांची संख्या अधिक असणार आहे. यामध्ये शाळांच्या चित्ररथासहित यावर्षी महापालिका मुख्यालय, आरटीओ, पोलिस विभाग यांचे विशेष चित्ररथ असणार आहेत. या मिरवणूकीचा शेवट टपाल नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यांजवळ सर्व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मिरवणूकीची सांगता होणार आहे.

त्यानंतर सकाळी १०.०० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये पोवाडा व शिवराज्याभिषेक सोहळा सादर करण्यात येणार आहे. यानंतर बक्षीस वितरण होईलव मान्यवरांची मनोगते होऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात येईल.

लोकसहभागातून व पनवेल महानगरपालिकेच्या वतीने काढण्यात येणार्‍या या भव्य मिरवणूकीमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**शिवकालीन मैदानी खेळांचे विशेष आर्कषण**

यावर्षी शिवजयंती मिरवणूकीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक,लाईन आळी, सावरकर चौक, महापालिका मुख्यालय, टपाल नाका पाच ठिकाणी शिवकालीन मैदानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात येणार आहे.

या शिवकालीन मैदानी खेळांमध्ये तलवारबाजी, लाठीकाठी, दाणपट्टा असे विविध खेळांचा समावेश असणार आहे.

# अल्पवयीन बालिकेसमोर अश्लील वर्तन करणार्‍या तरुणास अटक

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीसमोर अश्लील चाळे व मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्याची घटना घडली असून याप्रकरणी एका २२ वर्षीय तरुणास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, १४ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६ वाजता पीडित बालिका गावाजवळील जिल्हा परिषद शाळेच्या नळावर पाणी भरण्यासाठी गेली होती. तेव्हा आरोपी आदिनाथ आदेश कदम (वय २२, ता. महाड,जि. रायगड) याने तिच्याकडे जाऊन तू एकटीच आलीस का? असे विचारले. नंतर माझ्याजवळ काहीतरी आहे, ये असे सांगून त्याने आपली पँट खाली केली आणि तिच्यासमोर अश्लील चाळे व हावभाव केल्याने घाबरलेली बालिका पळू लागली असता आरोपीने तिचा पाठलाग केला.

याबाबत पीडितेच्या आईने १५ फेब्रुवारी रोजी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात आरोपीत विरोधात तक्रार दिली असून यानुसार पोलिसांनी आरोपीस अटक करून त्याचेवर भारतीय, पोक्सो कायद्याचे कलम १२ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याचे संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, श्रीवर्धन सविता गर्जे यांच्या देखरेखी खाली सुरू आहे.

# महाराष्ट्राचा महावक्ता खुल्या वक्तृत्व स्पर्धेत गव्हाण विद्यालयाचा स्मित मोकल दुसरा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

प्रबोधन गोरेगाव आणि फन लीडर्स फाउंडेशनतर्फे आयोजित महाराष्ट्राचा महावक्ता राज्यस्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा मुंबई येथील गोरेगाव मध्ये रविवार दि.१५ फेब्रुवारी रोजी झाली.या स्पर्धेतील नवोदित वक्त्यांतून विशेष लक्षवेधी वक्ता ह्या गटातून रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मधील इयत्ता आठवीच्या वर्गातील स्मित कुंदन मोकल ह्या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकावला.



या स्पर्धेमध्ये १० वर्षापासून ते ७५ वर्षापर्यंतच्या स्पर्धकांनी भाग घेतला.स्पर्धकांना सहा मिनिटांत आपले मनोगत व्यक्त करण्याची संधी होती. दुसरा क्रमांक प्राप्त करणार्‍या स्मित कुंदन मोकल याला रोख रक्कम तीन हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले. त्याचबरोबर गव्हाण विद्यालयातील सहभागी वक्ते कु.आरोही बापू नाळे,वैष्णव सचिन देशमुख तसेच उपशिक्षिका हर्षला राहुल पाटील यांना देखील सन्मानचिन्ह आणि प्रशस्त पत्र देऊन गोरेगाव गौरविण्यात आले.

विद्यार्थी व शिक्षकांच्या या यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्यासह उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील,लाईफ मेंबर रविंद्र भोईर,लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे,ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले,वक्तृत्व स्पर्धा विभागाचे प्रमुख सागर रंधवे,सहायक उज्वला म्हात्रे, त्याचप्रमाणे या स्पर्धेची माहिती उपलब्ध करून देणार्‍या दर्शना माळी आणि चारुशीला ठाकूर आदिंनी अभिनंदन केले. स्पर्धेत सहभागी होणार्‍या विद्यार्थ्यांसमवेत त्यांचे पालक सर्वश्री कुंदन मोकल,बापू नाळे व सचिन देशमुख आदी उपस्थित होते.

# खोपोलीत शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा रूट मार्च



**चौक : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६व्या जयंतीनिमित्त खोपोली शहरात उत्साहाचे वातावरण असताना कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिस प्रशासन सज्ज झाले आहे.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षका श्रीमती आंचल दलाल तसेच खालापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सचिन हिरे यांनी शहरात भव्य रूट मार्चचे आयोजन केले.

हा रूट मार्च खोपोली शहरातील प्रमुख मार्ग तसेच शिळफाटा परिसरात काढण्यात आला. विविध संस्था, मंडळे आणि संघटनांकडून दरवर्षी मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी केली जाते. मिरवणुका, ढोल-ताशांचे पथक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि ऐतिहासिक देखावे या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि नागरिकांना सुरक्षित वातावरणात उत्सव साजरा करता यावा, यासाठी पोलिसांनी ही दक्षता घेतली.

# विविध मागण्यांसाठी ग्रामपंचायत कर्मचार्‍यांची जि.प. कार्यालयावर धडक

**अलिबाग : प्रतिनिधी**

वारंवार पाठपुरावा करूनदेखील जिल्हा परिषद मागण्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याने जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचारी आक्रमक झाले आहेत. आपल्या विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी आज रायगड जिल्ह्यातील ग्राम पंचायत कर्मचार्‍यांनी जिल्हा परिषद कार्यालयावर धडक दिली. वेळेत मागण्यांची पूर्तता न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

अलिबागमधील संघटना सदन इथून हा मोर्चा निघाला. जिल्हाभरातील ग्रामपंचायत कर्मचारी आपले काम बंद ठेवून आजच्या आंदोलनात सहभागी झाले होते. यासंदर्भात रायगड जिल्हा परिषदेकडे वारंवार तक्रारी करून देखील दुर्लक्ष केले जाते. आमच्या मागण्यांना केराची टोपली दाखवली जाते असा आरोप आंदोलकांनी केला. मागण्यांची वेळेत पूर्तता झाली नाही तर आंदोलन अधिक आक्रमक करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. रायगड जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मंगेश म्हात्रे, उपाध्यक्ष गोविंद म्हात्रे, संतोष चव्हाण, सचिव रमेश तांडेल, कृती समिती संघटक संदीप नागे, सुरेंद्र पालकर, मोहिनी गोरे यांच्या नेतृत्वाखाली आज रायगड जिल्ह्यातील शेकडो कर्मचारी आंदोलनासाठी एकवटले होते.

जिल्हा परीषद कार्यालयाच्या प्रवेशव्दारासमोर मोर्चा अडवण्यात आला. जिल्हा परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले या व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये व्यस्त होत्या. त्यांची भेट घेतल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही असा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेतला. तो पर्यंत आंदोलक ठाण मांडून होते. आंदोलकांनी सीईओ नेहा भोसले यांची भेट घेतली. आपल्या मागण्या त्यांच्यापुढे मांडल्या. या मागण्यांवर योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन नेहा भोसले यांनी दिल्याचे मंगेश म्हात्रे यांनी सांगितले.



# गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. भोयर यांच्यासमवेत नवी मुंबई झोपडपट्टी पुनर्वसनासंदर्भात बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या दालनात झोपडीपट्टी पुनर्वसन संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत पार पडली. सदर बैठकीत नवी मुंबई शहरातील झोपडीपट्टी पुनर्वसन प्रकल्पांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव, विविध शासकीय विभागांमधील समन्वय बाबत आढावा घेण्यात आला.

प्रकल्पांची अंमलबजावणी गतीमान करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ राबविण्याच्या सूचना संबंधित अधिकार्‍यांना राज्यमंत्री यांनी दिल्याची माहिती आज पत्रकारांशी बोलताना मंदा म्हात्रे यांनी दिली . झोपडपट्टी पुनर्वसन संदर्भात लवकरच शहरात कार्यशाळा घेणार असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले.



सदर बैठकीत जीबीआर प्रोसेस मध्ये झोपडपट्टी सर्वेक्षण, डीसीआर मेकिंग व बायोमॅट्रिक त्यात पात्र - अपात्र प्रोसेस सुरु केली आहे . तुर्भे येथील शिवाजी नगरमध्ये जीबीआर प्रक्रिया सुरु झाली असून ३ सी या टप्पापर्यंत पोहचली आहे .राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी शासन निर्णयानुसार मुद्दा क्र. १३ प्रमाणे संबंधितांना आदेश देऊन पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे येणार्‍या काही काळात झोपडीधारकांना आपल्या हक्काचे घर मिळणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

सदर प्रकल्प अंतर्गत १५१ बेलापूर मतदारसंघामध्ये अंदाजे ७२६६५ झोपडीधारकांना आपल्या हक्काचे घर उपलब्ध होणार आहे . ज्या काही सूचना किंवा माहिती हवी असेल तर माझ्या कार्यालयाशी संपर्क साधावा . या प्रकल्पांत सन २००० च्या आधीच्या झोपडीधारकांना मोफत मालकी हक्क मिळणार असून सन २००० ते २०११ नंतरच्या झोपडीधारकांना रक्कम रु. २,५०,०००/- रुपये भरून मालकी हक्क प्राप्त होणार आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या समवेत गृहनिर्माण विभाग मंत्रालय अवर सचिव सुनिल दकीरडे, गृहनिर्माण विभाग मंत्रालय उपसचिव चं.द.तरंग, मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळवी, ठाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण उप अभियंता राजुकुमार पवार, ॲड. संतोष पळसकर, ॲड. शंतनू पळसकर, ॲड. गोपाल राठोड, राजेश पाटील व अन्य अधिकारी उपस्थित होते असे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले . सदर पत्रकार परिषदेत माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, कुंदन म्हात्रे, ज्योती पाटील, तेजस्वी म्हात्रे नारायण वाघमारे, नितीन सोनवणे आदी उपस्थित होते.

# कोपरखैरणेत शिवजन्मोत्सव सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दैदिप्यमान इतिहासाचा जागर करण्यासाठी नवी मुंबईतील कोपरखैरणे येथे 'शिवजन्मोत्सव सोहळ्या'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. डीएम प्रतिष्ठान आणि युवासेनेचे उपजिल्हा प्रमुख दिपेश सुहास म्हात्रे यांच्या संकल्पनेतून हा सोहळा पार पडणार आहे.



कार्यक्रमाच्या पोस्टरचे अनावरण नुकतेच करण्यात आले असून, यावर्षीचे हे उत्सवाचे पहिले वर्ष आहे. गुरुवार १९ फेब्रुवारी रोजी या सोहळ्याच्या माध्यमातून शिवरायांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे.

शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून सकाळपासूनच विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे:सकाळी ९ वा. मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना,सकाळी १० वा. भक्तिमय वातावरणात 'भजन' रंगणार,सकाळी ११ वा. शिवभक्तांसाठी दर्शनाचा लाभ,सायंकाळी ५ ते ९ वा. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे शिवचरित्र व्याख्याते ह.भ.प. अमित महाराज म्हात्रे यांचे 'शिव व्याख्यान' संपन्न होईल,रात्री ९ वा. सर्व शिवभक्तांसाठी शिवभोजन असणार आहे.

हा सोहळा दियोदिनी बंगलो, प्लॉट नं. १७१, सेक्टर १९ सी, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे पार पडणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक दिपेश म्हात्रे यांनी सर्व शिवप्रेमींना केले आहे.

## रायगड जिल्हाधिकारी यांनी जाहीर केल्या स्थानिक सुट्ट्या

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यातील महसूल हद्दीमध्ये शासनाच्या सर्व खात्यांमधील कार्यालयांकरिता ३ स्थानिक सुट्ट्या जाहीर करण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार सन-२०२६ या वर्षाकरिता सोमवार, दि.०२ मार्च २०२६ रोजी होळी, शुक्रवार, दि.२८ ऑगस्ट २०२६ रक्षाबंधन, शुक्रवार, दि.२५ सप्टेंबर २०२६ रोजी अनंत चतुर्थी या तीन स्थानिक सुट्ट्यांची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

## दुखवटा

### दामोदर केने

**उरण :** पनवेल तालुक्यातील चावंडोली येथील भजनीबुवा तथा सामाजिक कार्यकर्ते दामोदर पदु केने (७६)यांचे नुकतीच हृदय विकाराच्या झटक्याने आकस्मिक, दुःखद निधन झाले आहे..त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,सुना,चार मुली,जावई,नातवंडे असा त्यांचा आप्त परिवार आहे.त्यांचा दशक्रिया विधी गुळसुंदे येथे २३ फेब्रुवारी तर उत्तर कार्य २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राहत्या घरी चावंडोली येथील पार पाडण्यात येणार आहे.



### राधाबाई भोईर

**कर्जत :** सहकार क्षेत्रातील नामवंत सामाजिक कार्यकर्ते स्व. पोपटशेठ तथा मारुती भोईर यांच्या पत्नी राधाबाई मारुती भोईर यांचे वयाच्या ९०व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.राधाबाई भोईर या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश प्रतिनिधी भगवान भोईर, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सहकार सेल उपाध्यक्ष वसंतराव भोईर आणि शिवसेना शिंदे गटाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष संतोष भोईर यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या मृत्यूनंतर भोईर कुटुंबीय यांनी भजन, कीर्तन यांचे कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.



### डॉ. श्रीनिवास वाळिंबे

**चौक:** सुप्रसिद्ध डॉक्टर श्रीनिवास गजानन वाळिंबे यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाल्याने चौक परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या मागे पत्नी डॉ. अपर्णा वाळिंबे, मुलगा डॉ.केदार, सुन डॉ.रुचा वाळिंबे, मुलगी शलाखा, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



# बेशिस्त रिक्षाचालकांवर पोलिसांची कारवाई

## पनवेलमध्ये १८० जणांना दंड; ३४ रिक्षा जप्त



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये बेशिस्त रिक्षा चालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई करत ३४ रिक्षा जप्त केल्या. या वेळी १८० जणांवर कारवाई करत एक लाख ६८ हजारांचा दंड वसूल केला.

१४ फेब्रुवारी रोजी पनवेल शहरात एका रिक्षाचालकाने जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने महिला प्रवाशावर तीक्ष्ण धारदार हत्याराने जीवघेणा हल्ला केल्याची गंभीर घटना घडली होती. या धक्कादायक घटनेनंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पनवेल वाहतूक शाखा, पनवेल शहर पोलीस स्टेशन, खांदेश्वर पोलीस स्टेशन, आरटीओ पनवेलमार्फत विशेष तपासणी व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली. तसेच पोलीस मित्र, ज्येष्ठ नागरिक यांचे सहकार्य लाभले. नियमभंग सहन केला जाणार नाही असा स्पष्ट संदेश देत ही धडक कारवाई करण्यात आली.

पनवेल रेल्वे स्टेशन (पूर्व व पश्चिम) रिक्षा स्टॅन्ड तसेच एचडीएफसी सर्कल परिसरात एकूण पाच पथकांमार्फत मोठ्या प्रमाणावर तपासणी करण्यात आली. या मोहिमेत अवैध प्रवासी वाहतूक करणारे, फिटनेस व विमा कालबाह्य असलेले, विना परवाना (लायसन्स), विना गणवेश तसेच नियमांचे उल्लंघन करणारे रिक्षाचालक/मालक यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आली सदर कारवाई औदुंबर भा. पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल वाहतूक शाखा यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली पार पडली.

### कारवाईचा तपशील

**एकूण रिक्षा तपासणी : ३५०**
**कारवाई : १८०**
**जप्त रिक्षा : ३४**
**दंड वसुली : १,६८,५०० रुपये**

या कठोर कारवाईमुळे बेशिस्त रिक्षाचालकांना स्पष्ट इशारा देण्यात आला असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ झाली आहे. भविष्यातही अशा प्रकारच्या विशेष मोहिमा सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# मध्यरात्री डोक्यात दगड घालून एकाची हत्या

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराजवळील गांधी हॉस्पिटलसमोरील उड्डाणपुलाखाली अज्ञात कारणावरून एका व्यक्तीच्या डोक्यात दगड घालून हत्या केल्याची घटना सोमवारी मध्यरात्री घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

पनवेल शहराजवळील गांधी हॉस्पिटल समोरील उड्डाणपुलाखाली विजय (पूर्ण नाव माहित नाही) अंदाजे वय ३७-३८ वर्षे हा नेहमी त्या ठिकाणी नाका कामगार येथे कामासाठी उभा राहत असे व प्रामुख्याने कॅटरिंगची पडेल ती कामे करत असे. त्याला देशी दारू पिण्याचे व्यसन होते. सोमवारी रात्री अज्ञात कारणावरून अज्ञात इसमाने त्याच्या डोक्यात दगड घालून त्याची निघृण हत्या केली व तेथून तो पसार झाला आहे.

या घटनेची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच त्यांनी तात्काळ पोलीस उपयुक्त प्रशांत मोहिते, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांना माहिती दिली तसेच वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी घटनास्थळी रवाना झाले असून त्यांनी हा खून कोणत्या कारणावरून केला हे त्याचा शोध घेत आहेत.

# लग्न जुळविणाऱ्या साईटवरून ओळख करून महिलेवर बलात्कार

**पनवेल : वार्ताहर**

लग्न जुळविणाऱ्या वेबसाइटवरून एका महिलेशी ओळख वाढवून तिला लग्नाचे खोटे आमिष दाखवित तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. तसेच या महिलेची सुमारे १२ लाखांची आर्थिक फसवणूकही करण्यात आली आहे. अक्षय पाटील (वय ३३) असे या प्रकरणातील आरोपीचे नाव असून कामोठे पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

या घटनेतील ३२ वर्षीय पीडित महिला कामोठे येथे राहण्यास असून आरोपी अक्षय हा पनवेलमधील करंजाडे परिसरात राहण्यास आहे. हे दोघेही घटस्फोटीत असून या दोघांनी एका मॅट्रिमोनिअल वेबसाइटवर लग्नासाठी नोंदणी केली होती. नोव्हेंबर २०२५ मध्ये आरोपी अक्षयने पीडित महिलेशी ओळख वाढवून तिच्याशी लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर त्याने पीडित महिलेचा विश्वास संपादन करत, तिला लोणावळ्यातील हॉटेलमध्ये, कामोठे सेक्टर १४ या ठिकाणी नेऊन तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. तसेच त्याने व्यवसायासाठी आणि वैयक्तिक अडचणींचे कारण सांगून पीडित महिलेकडे वेळोवेळी पैशांची मागणी केली. अक्षय याने पीडितेला तिच्या नावावर बँकेचे कर्ज काढण्यास भाग पाडले. त्यातून आलेली रक्कम त्याने स्वतःसाठी वापरली. अशा प्रकारे अक्षय याने पीडित महिलेची एकूण ११ लाख ९२ हजार ९०० रुपयांची फसवणूक केली. ही फसवणूक लक्षात येताच पीडित महिलेने रविवारी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# महापौर नितीन पाटील यांचे नागरी समस्यांबाबत तोडगा काढण्याचे आश्वासन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रहार जनशक्ती पक्ष आणि अन्याय अत्याचार निर्मूलन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.१७) पनवेल शहरातील विविध नागरी समस्यांबाबत पनवेल महानगरपालिका मुख्यालयावर ठिय्या आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी तत्परता दाखवत स्वतः आंदोलनस्थळी सामोरे जाऊन आंदोलनकर्त्यांची भेट घेतली व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यावर योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.





या वेळी पनवेल तालुक्यातील वाघऱ्याचीवाडी, टेंभोडे, आदिवासीवाडी, सागवाडी व वळवली या परिसरातील नागरिकांना मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत निवेदन सादर करण्यात आले. संबंधित भागांमध्ये पाणीपुरवठ्याची अपुरी व्यवस्था, स्ट्रीट लाईटची कमतरता, कच्च्या रस्त्यांची दुरवस्था, स्वच्छतेचा अभाव, तसेच स्वच्छतागृह आणि स्मशानभूमीची अनुपलब्धता यांसारख्या प्रश्नांकडे आंदोलनकर्त्यांनी लक्ष वेधले. ना. तहसीलदार (कुळवहीवाट) रायगड, अलिबाग यांच्या कार्यालयाकडील दि. ०४/०३/२०२५ च्या पत्राचा संदर्भ देत या भागांतील नागरी प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी करण्यात आली.

पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक पंप व पाईपलाईन व्यवस्था, अतिरिक्त पथदिवे, रस्ते पक्के करणे, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्वेक्षण, तसेच स्वच्छतागृह व स्मशानभूमीसाठी जागा निश्चित करणे या प्रमुख मागण्या निवेदनात नमूद करण्यात आल्या. महापौर नितीन पाटील यांनी संबंधित वस्त्यांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांच्या समस्या पाहणी करून त्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे.

# युवा महोत्सवात ‘सीकेटी’च्या विद्यार्थ्यांना सुवर्ण आणि रौप्यपदक

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मैसूर येथे झालेल्या वेस्ट साऊथ झोन आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाच्या संघाने चमकदार कामगिरी केली असून यामध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सी.के.टी महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी सुवर्ण आणि रौप्य पदकावर आपले नाव कोरले आहे.

मुंबई विद्यापीठ ज्या वेस्ट साऊथ झोन विभागांतर्गत येते, त्यामध्ये महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक या राज्यातील विद्यापीठांचा समावेश असतो. यावर्षी मैसूर येथे आयोजित करण्यात आलेल्या या सांस्कृतिक स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या ४० विद्यार्थ्यांच्या निवडक चमूने प्रतिनिधित्व केले होते. यामध्ये सी.के.टी महाविद्यालयाच्या क्षितिज गायकवाड आणि जीत जाधव या दोन विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. या बद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुक्सफपगुफ देऊन या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी संस्थेचे सचिव डॉक्टर एस. टी. गडदे, सदस्य राहुल घरत, प्राचार्य एस. के. पाटील, गणेश जगताप उपस्थित होते. दरम्यान या यशानंतर या दोन्ही विद्यार्थ्यांची निवड आता राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी झाली आहे. देशातील प्रमुख चार विभागांतून निवडल्या गेलेल्या स्पर्धकांमध्ये होणारी ही अंतिम फेरी मार्च महिन्यात चेन्नई येथे पार पडणार आहे.



# हिंद दी चादर कार्यक्रमांतर्गत महापालिकेच्या शाळांची प्रभात फेरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त भव्य हिंद-दी-चादरया ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन खारघर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या जनजागृतीसाठी महापालिकेच्यावतीने पालिकेच्या शाळांची पनवेल शहरात प्रभातफेरी काढण्यात आली. तसेच विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे व शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी यांच्या ३५०व्या शहिदी समागम निमित्त महपालिकेच्यावतीने विविध कार्यक्रम घेण्यात येत आहे.आज दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी पनवेल महानगरपालिका शाळा क्रमांक ५ मोठा खांदा, शाळा क्रमांक६ धाकटा खांदा व लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये हिंद दी चादर कार्यक्रमाचे बॅनर हातात घेऊन विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या.



विद्यार्थ्यांना मानवंदना गीत ऐकवण्यात आले. या तिनही शाळेत निबंध स्पर्धा, भाषण स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच गायन स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या. श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी यांच्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेतला.

# त्रिशा म्हात्रेचा राज्यस्तरीय बालचित्र स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन यांच्या कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आयोजित राज्यस्तरीय बालचित्र स्पर्धेत चिरनेर येथील पी.डी.खारपाटील माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी त्रिशा किरण म्हात्रे हिने राज्यात नेत्रदीपक यश मिळवत द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.



कला विश्वविद्यालय शांतिनिकेतन सांगली येथे १६ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडलेल्या ६५ व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन (विद्यार्थी विभाग) कार्यक्रमात राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण संसदीय कार्य व पालकमंत्री चंद्रकांत पाटील तसेच खासदार विशाल पाटील यांच्या हस्ते त्रिशा म्हात्रे या विद्यार्थिनीला रोख रकमेचे पारितोषिक व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

उरण तालुक्यातील चिरनेर जंगल सत्याग्रह व महागणपतीच्या तीर्थस्थानामुळे प्रसिद्ध असलेल्या चिरनेर गावाच्या शिरपेचात त्रिशाच्या यशामुळे आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्रिशा म्हात्रे हिच्या यशाबद्दल तिच्यावर शैक्षणिक, सामाजिक, राजकीय तसेच विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या आई - वडीलांचे आणि शिक्षकांचे विशेष मार्गदर्शन लाभले असल्याच्या भावना त्रिशा म्हात्रे हिने व्यक्त केल्या.

पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे प्रशासकीय अधिकारी व्ही.ए.पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादूर, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्रिशाचे विशेष कौतुक करित अभिनंदन केले व तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

त्रिशा म्हात्रे या विद्यार्थिनीच्या यशामुळे विद्यालयासह संपूर्ण उरण तालुक्यात सर्वच स्तरातून तिचे कौतुक होत आहे.

# सीकेटी कॉलेजमध्ये पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रसायनशास्त्र विभागामार्फत शिमाडझूच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त एम.एस्सी. भाग-१ व भाग-२, (विश्लेषणात्मक रसायनशास्त्र, सेंद्रिय रसायनशास्त्र व जैवतंत्रज्ञान) तसेच पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना आधुनिक विश्लेषणात्मक उपकरणांची तत्त्वे, कार्यपद्धती, कॅलिब्रेशन, ऑपरेशन, सुरक्षित हाताळणी तसेच गुणवत्ता मानके यांची माहिती देणे हा होता.

या कार्यक्रमासाठी शिमाडझू इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, अंधेरी- एलसी/एलसीएमएस केंद्राचे तज्ञ सहाय्यक व्यवस्थापक डॉ. अमोल शिंदे आणि जीसी/जीसीएमएस फार्मा मार्केट तज्ञ हेमंत केसरकर हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना विविध अत्याधुनिक उपकरणांबाबत सविस्तर माहिती दिली आणि प्रात्यक्षिक दाखवले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. डी. के. पाटील यांनी केले.

प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना ॲटोमिक ॲब्सॉर्प्शन स्पेक्ट्रोस्कोपी (ए.ए.एस) सह विविध विश्लेषणात्मक उपकरणांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एम.एस्सी. भाग-१ व भाग-२ रसायनशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान शाखेतील एकूण ९४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. बी. व्ही. जाधव, जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. डॉ. सीमा एस. कोकितकर तसेच रसायनशास्त्र व जैवतंत्रज्ञान विभागातील सर्व प्राध्यापकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले. हा प्रशिक्षण कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व ज्ञानवर्धक ठरला.



# गव्हाण विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभचिंतन

## चेअरमन अरुणशेठ भगत यांचे हस्ते नवनिर्वाचित पं.स. सदस्यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनियर कॉलेजमध्ये मंगळवारी (दि.१७) दहावी अर्थात एस.एस.सी.बोर्ड परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२६ ला प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांसाठी शुभचिंतन अर्थात सदिच्छा समारंभ उत्साहात झाला.





विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्या रंजना वास्कर, जिज्ञासा कोळी व वितेश म्हात्रे यांचेसह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच व पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, ॲड. राहुल घरत, माजी ग्रामपंचायत सदस्या योगिता भगत व रोशन म्हात्रे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व न्हावे येथील न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक प्रमोद कोळी, मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी.एन.घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राचार्या सायली वडवलकर, विशाल कोळी, किशोर कोळी, किशोर पाटील, सुधीरशेठ ठाकूर, ॲड.रूपेश म्हात्रे, कुंदन मोकल, राजश्री नाळे, राजकिरण कोळी, जयश्रीताई घरत, सुजाता पाटील, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेजचे प्रतिनिधी माणिक घरत व जयराम सोनटक्के, इयत्ता नववीचे व दहावीचे विद्यार्थी व शिक्षक विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आवर्जून उपस्थित होते.

संस्थेचे लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे यांचेही समयोचित भाषण झाले.तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर प्रमोद कोळी व माजी विद्यार्थी ॲड.रूपेश म्हात्रे यांनीही आपल्या भाषणांतून शुभेच्छा दिल्या. करंजाडे गणनातून नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्या रंजना वास्कर यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी सुयश चिंतताना विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लावून शिक्षकांनी ठेवलेली भरघोस पारितोषिके जिंकावीत तसेच विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यात उत्तुंग यश संपादन करावे, असे आवाहन केले.

या वेळी गोरेगाव येथे नुकत्याच संपन्न झालेल्या खुल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत लक्षवेधी नवोदित वक्ता या गटातून विद्यालयाचा विद्यार्थी स्मित कुंदन मोकल याचा द्वितीय क्रमांक व आरोही नाळे व वैष्णव देशमुख आणि उपशिक्षिका हर्षला पाटील यांचा प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्हे देवून गौरव झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. विशेष सत्कार सोहळ्याचे निवेदन ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी केले.

## संपादकीय

# एआयचा महाकुंभ

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या म्हणजेच एआयच्या क्षेत्रात भारताचे वाढते वर्चस्व सिद्ध करणारी ‘कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषद’ सोमवारी राजधानी नवी दिल्लीत सुरू झाली. कृत्रिम बुद्धिमत्तेतून जगात होणारे बदल स्वीकारण्यासाठी आपण कौशल्यसज्ज राहिले पाहिजे. तसे केले तर एआयमुळे रोजगारांना फटका बसण्याऐवजी नव्या नोकऱ्या निर्माण होतील हे या परिषदेतून देशभरातील सर्वसामान्य जनता व विशेषत: तरुणांपर्यंत पोहोचेल अशी आशा आहे.

**नव्वदच्या दशकात झालेल्या संगणकीय क्रांतीनंतर भारतीय संगणक अभियंते कित्येक देशांमध्ये पोहोचले आणि जगभरात संगणक क्रांतीला पुढे नेण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पाठोपाठच ‘जागतिक टेक हब’ म्हणून भारताची ओळख जगभराला झाली. आज कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे होणाऱ्या परिवर्तनातही भारत जगात आघाडीवर असून एआय क्षेत्रातील भारताची प्रगती ही महत्त्वाकांक्षा व जबाबदारी या दोन्ही गोष्टींचे प्रतिबिंब आहे असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी ‘इंडिया एआय इम्पॅक्ट एक्स्पो २०२६’चे उद्घाटन करताना केले. जगभरातील महत्त्वाचे नेते, उद्योजक, तंत्रज्ञान कंपन्यांचे प्रमुख व असंख्य तज्ज्ञ या परिषदेत सहभागी आहेत. विकसनशील देश व सर्वसामान्य जनता या परिषदेच्या केंद्रस्थानी आहे. भारताच्या संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातील क्षमता अफाट आहेत. त्यामुळेच केंद्र सरकारही पुढे सरसावले असून भविष्यातील ‘एआय’आधारित सेवांच्या दृष्टीने भारतीय युवकांना प्रशिक्षणसज्ज करण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले असल्यामुळे जागतिक स्तरावरील बड्या कंपन्याही भारताकडे आशेने पाहात आहेत. आज भारतात आरोग्यसेवा, वित्त, कृषी आणि शिक्षण यांसह विविध उद्योगांमध्ये एआयचा वापर सुरू झाला आहे. भारतही वेगाने कृत्रिम बुद्धिमत्तेला आपल्या कवेत घेऊ इच्छितो, त्यामुळेच भारताने या क्षेत्रातील गुंतवणुकीकडे लक्ष वळवले आहे. केंद्र सरकारही विकासाला चालना देण्यासाठी एआयचे महत्त्व जाणून आहे. भारत ‘एआय’मधील आंतरराष्ट्रीय सहकार्याचा केंद्रबिंदू म्हणून उदयास येत आहे. जगातील सर्वात मोठ्या इंटरनेट वापरकर्त्यांपैकी भारत एक आहे. भारताकडे प्रचंड प्रमाणात डेटा उपलब्ध आहे. हा डेटा एआय मॉडेल्सच्या प्रशिक्षणासाठी महत्त्वाचा आहे. भारत हा मोठी तरुण लोकसंख्या असलेला देश आहे. तंत्रज्ञान क्षेत्रासाठी हे मनुष्यबळ महत्त्वाचे आहे. मशीन लर्निंग आणि मोठ्या प्रमाणातील मनुष्यबळ एकमेकांना कमकुवत करण्याऐवजी पूरक म्हणून काम करणाऱ्या सर्वात मोठ्या देशांपैकी भारत एक असू शकतो. त्यासाठी एआयचा विकास व्यापक रोजगारनिर्मितीशी जोडण्याची गरज आहे. एआयच्या क्षेत्रात येत्या काळात असंख्य नोकऱ्या निर्माण होतील. तेव्हा त्यांचा लाभ करून घेण्यासाठी संबंधित कौशल्यांचा विकास आवश्यक आहे. ‘सर्वजनहिताय, सर्वजनसुखाय’ अशी संकल्पना या एआय परिषदेच्या केंद्रस्थानी आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेतून होणारे बदल स्वीकारणाऱ्यांना एआय फायदेशीर ठरेल. तर बदलांना विरोध करणारे मागे पडतील हे उघड आहे. बँकांमध्ये संगणक आल्यानंतर रोजगार नष्ट होतील अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. प्रत्यक्षात संगणक आल्यानंतर बँकांमधली उत्पादकता वाढल्याचे दिसून आले. कृत्रिम बुद्धिमत्तेतूनही नोकऱ्या संपणार नाहीत तर त्या लहान–लहान कामांमध्ये विभागून कामकाजाची रचना बदलेल. ही शिखर परिषद म्हणजे भारतातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढीला प्रोत्साहन आणि वेग देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेला एक अभूतपूर्व उपक्रम आहे. या प्रयत्नांमुळे जागतिक स्तरावर विकसित होत असलेल्या एआय परिसंस्थेत एक अग्रगण्य शक्ती म्हणून भारताला स्थान मिळण्यास मदत होईल.**

# सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालय दलालांच्या विळख्यात






**खबरबात**
**महेश शिंदे**

महाड तहसील कार्यालयातील सहाय्यक दुय्यम निबंधक यांचे दालन सध्या दलालांच्या विळख्यात सापडले असून, सर्वसामान्य नागरिकांची भरमसाठ लूट होत आहे. प्रत्येक नोंदणी मागे पाच ते दहा हजार रुपये काही वेळा एकरी दहा हजार अशा दराने पैसे उकळले जात असून याप्रकरणी अधिकारी व दलाल एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करीत आहेत. याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी विशेष लक्ष घालून सर्वसामान्य नागरिकांची होणारी ही भरमसाठ लूट त्वरित थांबवावी अशी आता मागणी होऊ लागली आहे. या दलालांना आळा घातला नाही तर तर पीडित जनताच या दलालांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही.

आज–काल कोकणात जमीन घेण्याचे फॅड प्रचंड वाढले असून, मुंबई पुणे तसेच गुजरात व राजस्थान मधील परप्रांतीय मोठ्या प्रमाणावर कोकणात जागा खरेदी करीत आहेत. ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व असलेल्या व औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या महाड तालुक्यात देखील जमिनींचे खरेदी विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. खरेदी विक्री प्रमाणेच गहाणकत व इतर नोंदणीचा देखील यामध्ये समावेश होत असतो. ही सर्व नोंदणी महाड तहसील कार्यालयातील सहाय्यक दुय्यम निबंध सूर्यवंशी यांच्या कार्यालयामध्ये होत असते. शासकीय यंत्रणेप्रमाणे या कार्यालयात कामकाज होणे अपेक्षित असताना दलाल या कार्यालयामध्ये ठाण मांडून बसलेले आहेत या दलालांची टोळी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सक्रिय असून प्रत्येक दस्त नोंदणीच्या नावाखाली जनतेकडून पाच ते सहा हजार रुपये अधिकाऱ्यांच्या नावाखाली व तेथील कर्मचाऱ्यांच्या नावाखाली उकळले जात आहेत. याप्रकरणी आज जरी कोणी पीडित तक्रार करायला पुढे येत नसला तरी येत्या काळात जनतेमधून प्रचंड उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही. महाड तालुक्यात खरेदीचे व्यवहार हे मोठ्या धनदांडग्यां व श्रीमंत लोकांकडून केले जात आहेत. गोरगरीब शेतकऱ्यांना अल्प मोबदल्यात त्यांच्या जागा बळकावून जमीन विक्री करणारे दलाल या धनदांड्यांना कोकणातल्या या जमिनी घशात घालत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा किल्ले रायगड देखील या दलालानी सोडला नाही. किल्ले रायगडच्या परिसरातील जागा देखील परप्रांतीच्या घशात घातल्या जात आहेत. या ठिकाणी या परप्रांतीयांकडून मोठ्या प्रमाणावरती जंगलतोड करून जमिनीचे सपाटीकरण केले जात आहे. या सपाटीकरणामुळे निसर्ग पर्यावरण त्याचबरोबर किल्ले रायगडलाही प्रचंड धोका निर्माण झाला आहे. किल्ले रायगड ही संरक्षित वस्ती असून नुकतीच त्याची जागतिक वारसा स्थळांमध्ये नोंद झाली आहे. मात्र या सर्व परिसरात झालेल्या जमिनीच्या खरेदी विक्रीमुळे येथील पर्यावरण व सांस्कृतिक वारसा धोक्यात आला असून ही जागतिक वारसा नोंद लवकरच रद्द होण्याचा धोका देखील निर्माण झाला.

महाड शहरालगतच्या जागा देखील मोठ्या प्रमाणावर डेव्हलपमेंट च्या नावाखाली बिल्डरच्या घशात घातल्या जात आहेत. महाड नगरपालिका क्षेत्राबाहेर ग्रामपंचायत हद्दीमध्ये अनियमित व अनधिकृत अवैध व कायद्याला धाब्यावर बसून मोठ्या प्रमाणावरती कन्स्ट्रक्शन व गृहप्रकल्प साकार केले जात आहेत. या साकार होणाऱ्या गृहप्रकल्पांना कोणतेही निर्बंध नाहीत की कोणाचा अंकुश नाही. कलेक्टर कडून बांधकाम परवानगी आली की ग्रामपंचायतला देखील हे विकासक विचारत नाहीत. या सर्व घडामोडींचे केंद्र हे सहाय्यक दुय्यम निबंधक यांचे कार्यालय असून या कार्यालयामध्ये बेधुंदपणे व मस्तावलेपणाप्रमाणे वावरणारे हे दलाल आज अक्षरशः माणुसकीला काळीमा फासणाऱ्या अशा गोष्टी घडवीत असून एखाद्या गरजू शेतकरी जेव्हा बँकेकडून कर्ज घेतो आणि आपली जागा घर गहाण खत करण्यासाठी या दलालांचा जाळामध्ये अडकतो तेव्हा त्यांच्याकडूनही देखील हे दलाल पाच दहा हजार रुपये उकळत आहेत. हे म्हणजे मेलेल्या मड्याच्या टाळू वरचे लोणी खाण्यासारखे आहे. अशा ह्या दलालांचा जिल्हाधिकारी तथा सरकारने वेळीच बंदोबस्त केला पाहिजे. यांना दिले जाणारे परवाने रद्द केले पाहिजेत. या परवानांच्या आधारावर हे लोक या ठिकाणी आपली दुकाने थाटून बसले आहेत. या दुकानांच्या माध्यमातून अनेक दलाल या ठिकाणी एखाद्या वेश्याव्यवसायप्रमाणे ग्राहक शोधत असतात. महाराष्ट्रातला शेतकरी हा सावकारांच्या कर्ज जाळ्यातून मुक्त व्हावा व त्याच्या आत्महत्या थांबाव्यात अशी भूमिका वेळोवेळी मायबाप सरकार घेत असते. सावकारांचा मृत्यू फास जरी सुटला असला तरी या दलालांचा फास कर्ज घेणाऱ्या व त्यासाठी गहाण खत करणाऱ्या शेतकऱ्यांना गळ्याभोवती आवळत आहेत. महाडचे सहाय्यक निबंधक कार्यालय हे अशा दलालांपासून मुक्त व्हावे व सर्वसामान्य जनतेची कोणती आर्थिक फसवणूक न होता त्यांच्या दोस्तांच्या नोंदणी शासकीय नियम व निकषाप्रमाणे व्हाव्यात अशीच अपेक्षा आहे. मात्र प्रत्यक्षरीत्या पाहिले तर अधिकार्यांचे म्हणने आहे की हे दलाल (एजंट) आम्हाला बदनाम करीत असून आमच्या नावाने लोकांकडून हे दलाल लोक पैसे उघडत असल्याचे कबूल करत आहेत. र दुसरीकडे हेच दलाल आम्हाला या अधिकाऱ्यांचे व तेथील कर्मचाऱ्यांचे या दस्तामागे पैसे द्यावे लागतात त्यासाठीच आम्ही दस्त नोंदणी मागे हे पैसे घेत असतो असे हे दलाल सांगत असतात.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घालून दलालांचा बंदोबस्त करावा.

# क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा

कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याचा वध करणारे हुतात्मा मदनलाल दित्तमल धिंग्रा १७ ऑगस्ट १९०९ रोजी हसत हसत फासावर चढले. १ जुलै १९०९ रोजी पिस्तुलाच्या चार गोळ्या झाडून धिंग्राजींनी कर्झन वायलीचा वध केला होता. ’एका इंग्रज अधिकार्याचा भारतीय क्रांतियोद्धय़ाने केलेला वध’ एवढेच केवळ या घटनेचे महत्त्व नाही, तर हा होता अजिंक्यतेचा तोरा मिरवणार्या ब्रिटिशांच्या भूमीवर राहून त्यांच्याच एका अधिकार्याचा केलेला वध! ही अभूतपूर्व अशीच घटना होती . या घटनेनंतर सबंध हॉलमध्ये पळापळ माजलेली असताना मदनलालजींची नाडी सामान्य गतीनेच चालत होती. एवढेच काय, तर त्यांना अटक करून ठाण्यात नेल्यावरही ते पाचच मिनिटांत घोरू लागले होते. धिंग्राजींची झडती घेऊन त्यांच्याजवळ सापडलेल्या एकूण एक वस्तू जप्त करण्यात आल्या होत्या.

इथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे वायलीला धिंग्राजींनी मारले १ जुलै १९०९ ला. धिंग्राजींना फाशी झाली ती २९ जुलैला. फाशी देण्यात आली ती १७ ऑगस्ट १९०९ ला. म्हणजे अवघ्या महिनाभरातच इंग्रज शासनाने त्यांच्या दृष्टीने शत्रू असलेल्या क्रांतिवीरास फाशी जाहीर केली व दीडच महिन्यात तिची अंमलबजावणीही करून टाकली. जेव्हा धिंग्राजींच्या फाशीच्या आदल्या दिवशी, म्हणजे १६ ऑगस्ट १९०९ ला ’डेली मेल’मध्ये जेव्हा सावरकरांनी धिंग्राजींचे निवेदन प्रसिद्ध करविले, ज्या आपल्या निवेदनानंतर धिंग्राजी जगभरच्या क्रांतिकारकांचे प्रात:स्मरणीय प्रेरणास्थान झाले, त्यात ते म्हणतात ’एक हिंदू म्हणून माझी भावना अशी आहे की, माझ्या देशाचा अपमान हा परमेश्वराचाच अपमान होय.



## बदलते तंत्रज्ञान

# उन्हाळ्यात कमी होणार नाही कारचे मायलेज, हे करा...



नवीन कार खरेदी करत असताना सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण गाडीचे मायलेज किती आहे हे पाहिले जाते. खरे तर, ज्या कारला मायलेज चांगले असते, ती कार खरेदी करण्याला लोकपसंती देतात. मात्र, उन्हाळ्यामध्ये गाडीचे मायलेज कमी होते,

उन्हाळ्यामध्ये एसीशिवायचा प्रवास हा खूप अवघड होऊ शकतो. उन्हाळ्यापासून वाचण्यासाठी आणि प्रवास आरामदायी होण्यासाठी एसीचा वापर करतात. गाडीचा एसी जेवढ्या जास्त प्रमाणात वापरला जाईल, तितकेच मायलेज कमी होते. एसी सुरू असल्याने गाडीमध्ये असलेल्या इंजिन किंवा मोटरवर ताण येतो. अशामध्ये ते मेंटेन करण्यासाठी इंजिनला आधी ताकद निर्माण करावी लागते. त्यासाठी इंजिन इंधनाचा वापर करते.

वाहनाच्या कमी मायलेजला ड्रायव्हिंग स्टाईलही कारणीभूत आहे. विनाकारण गाडी सुरू ठेवणे, क्लच, गिअर व ब्रेकचा योग्य वेळी वापर न करणे या गोष्टींमुळेही गाडीचे मायलेज कमी होऊ शकते.गाडीच्या चाकांमध्ये पुरेशी हवा नसली तरीदेखील मायलेज कमी होण्याची शक्यता असते. चाकांमध्ये हवेचा दाब कमी असतो तेव्हा गाडी चालवताना इंजिनवरील दाब वाढतो. त्यामुळे इंधनाचा जास्त वापर इंजिनाकडून केला जातो. त्यामुळे मायलेज कमी होऊ शकते. तसेच गाडीचा मेंटेनन्स वेळेत केला गेला नाही तरीदेखील मायलेजवर परिणाम होऊ शकतो.

उन्हाळ्यात प्रवास करताना एसीचा वापर हा अत्यावश्यक असतो. उन्हाळ्यात कारचा एसी सतत वापरल्याने मायलेजवर परिणाम होतो. त्यामुळे आवश्यक असेल तेव्हाच एसीचा वापर करा म्हणजे मायलेजदेखील कमी होणार नाही.

जर का तुमची गाडी खूप काळपासून बंद असेल आणि आतून गाडी उन्हामुळे खूप तापली असेल, तर एसी सुरू करण्यापूर्वी गाडीच्या खिडक्या उघडा आणि आतील गरम हवा बाहेर जाऊ द्या. त्यासाठी तुम्ही गाडीतील पंखादेखील वापरू शकता. गरम हवा बाहेर गेल्यावर एसी सुरू करा. सुरुवातीला पूर्ण क्षमतेने एसी सुरू करू नये. गाडीला हळूहळू थंड होऊ द्या. तुमच्या गाडीला सनरूफ असेल, तर ते व्यवस्थित बंद ठेवावे.उन्हाळ्यामध्ये तुम्ही तुमची गाडी शक्यतो सावलीत उभी त्या ठिकाणी उभी करावी

# लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख



**निमित्त**


गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी हे मराठी पत्रकार, समाजसुधारक व इतिहासलेखक होते. त्यांचा जन्म १८ फेब्रुवारी १८२३ रोजी कोकणातील वतनदार घराण्यात झाला यांचे घराणे मूळचे कोकणातले वतनदार होते. घराण्याचे मूळचे आडनाव सिद्धये. त्यांच्या देशमुखी वतनामुळे देशमुख हे आडनाव रूढ झाले. गोपाळराव देशमुखांचे वडील हरिपंत देशमुख हे पुण्यात दुसर्या बाजीराव पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांचे फडणीस म्हणून काम करीत होते.

इतिहास हा त्यांचा आवडीचा विषय होता.त्यांनी या विषयावर एकूण १० पुस्तके लिहिली आहे त्यांना संस्कृत,फारसी,हिंदी,गुजराती भाषेचे चांगले ज्ञान होते.इंग्रजी शिक्षण घेणारे १९ व्या शतकातील पहिले नवशिक्षित गोपाळ हरी होते. त्यांनी मराठी शाळेत शिक्षण घेत असतानाच इंग्रजीचा अभ्यास केला. त्यांच्या वयाच्या २१ व्या वर्षी ते न्यायालयात भाषांतरकार झाले. ’सदर अदालती’ ची मुन्सिफीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर १८६२ पासून ते मुंबई सरकारच्या न्यायखात्यात न्यायाधीश झाले. त्या पदावर त्यांनी अहमदाबाद, नाशिक आणि सातारा येथल्या कोर्टांत काम केले.श्रमातून संपत्ती निर्माण होते या सूत्रातून गोपाळराव देशमुखांना दारिद्र्य निर्मूलनासाठी काय करायला पाहिजे याची दिशा समजली. हिंदुस्थानात ज्ञानाबरोबरच तंत्रज्ञान व नाना प्रकारचे उद्योगधंदे वाढावेत ही त्यांची तळमळ होती. स्वदेशात विद्यावृद्धी होऊन स्वभाषेत नवे नवे ज्ञान प्रसारित झाल्याशिवाय हिंदुस्थानला जगातील इतर प्रगत राष्ट्रांच्या बरोबरीचे स्थान मिळणार नाही, असे त्यांना तीव्रतेने वाटे. ‘हिस्टरी ऑफ द ब्रिटिश एम्पायर इन इंडिया’ या पुस्तकाच्या आधारे त्यांनी १८४२ मध्ये म्हणजे वयाच्या १९ व्या वर्षी ‘हिंदुस्थानचा इतिहास’ हे पुस्तक लिहिले.

त्यांनी १०८ छोटे छोटे निबंध लिहिले. हेच निबंध लोकहितवादींची शतपत्रे नावाने ओळखले जातात. या शतपत्रांच्या माध्यमातून त्यांनी समाजसुधारणाविषयक विचार समाजासमोर मांडले. ही शतपत्रे प्रभाकर या साप्ताहिकातून प्रसिद्ध झाली. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, वाङ्मयीन, ऐतिहासिक इत्यादी विषयांवर त्यांनी लहानमोठे असे सुमारे ३९ ग्रंथ लिहिले.लोकहितवादींनी अनेक उत्कृष्ट इंग्रजी ग्रंथांचे मराठीत भाषांतर केले. जातिसंस्था हा देशाच्या उन्नती होण्याच्या मार्गातील मोठा अडसर आहे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या लेखनातून केले. लोकहितवादी हे हिंदुस्थानातील अर्थशास्त्रज्ञ होते. मराठीतून लेखन करणारेही ते पहिलेच अर्थतज्ज्ञ. ‘लक्ष्मीज्ञान‘ या ग्रंथाद्वारे त्यांनी ॲडम स्मिथ‘प्रणीत अर्थशास्त्र वाचकांसमोर आणले. मातृभाषेतून शिक्षण या तत्त्वाचाही त्यांनी प्रसार केला..भारतखंड पर्व,पाणीपत ची लढाई,हिंदुस्थानाचा इतिहास,गुजरात देशाचा इतिहास,लंकेचा इतिहास,सुराष्ट्र देशाचा ससाक्ष इतिहास,हे काही त्यांची साहित्ये आहेत. १८७७ साली दिल्ली दरबारप्रसंगी ब्रिटिश शासनाने रावबहादूर ही पदवी देऊन त्यांना सन्मानित केले होते. ९ ऑक्टोबर १८९२ रोजी या थोर समाजसुधारकाचे निधन झाले.

(संदर्भ : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुरीच्या डाळीचे आरोग्यदायी फायदे

वरण किंवा आमटी सहसा तुरीची किंवा मुगाची केली जाते. चण्याच्या डाळी ऐवजी काहीजण तुरीच्या डाळीपासून पुरण बनवतात आणि त्यापासून बनवलेल्या पुरणपोळ्या तुपाबरोबर सेवन केल्या जातात. त्या सुद्धा अतिशय रुचकर लागतात.



दक्षिण भारतातही सांबर किंवा रसम करण्यासाठी तुरीच्या डाळीचा वापर केला जातो. काही पित्त प्रकृतीच्या व्यक्तींना तुरीचं वरण किंवा आमटी खाल्ली की त्रास होतो, पण त्या व्यतिरिक्त तूर हे कडधान्य रोजच्या आहारात असणं चांगलं असतं.

तुरीची डाळ कृमीनाशक म्हणजे जंताचा नाश करणारी असते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे शरीरातल्या कफदोषाला आणि अवाजवी प्रमाणात वाढलेल्या मेदाला कमी करणारी असते. त्यामुळे वजन कमी करायचं असेल तर संध्याकाळच्या जेवणात तुरीची पातळ आमटी आणि ज्वारी, बाजरीची भाकरी खाणं उत्तम आहे.

तुरीचं वरण किंवा आमटी बनवण्यासाठी डाळ शिजताना त्यात थोडं जास्त पाणी घालावं, डाळ छान शिजली आणि पातेल्याच्या तळाशी गेली की वरचं पाणी काढून टाकावं. तुरीची डाळ अधिक पथ्यकर असते. जखम भरून आल्यानंतर किंवा त्वचारोग बरा झाल्यानंतर कधी कधी त्वचेवर डाग शिल्लक राहतात. यावर तुरीची डाळ शिजत असताना त्यात हळकुंड टाकावं आणि नंतर ते उगाळून त्याचा लेप लावावा. यामुळे त्वचेचा वर्ण पुन्हा पुर्ववत होण्यास मदत मिळते.

पचन संस्था चांगली आणि निरोगी आरोग्यासाठी आपल्या आहारामध्ये तुरीच्या डाळीचा समावेश करा. तसेच पचनयोग्य तंतुमय पदार्थांसाठी आणि निरोगी आहारासाठी तुरीची डाळ चांगली असते.

वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारामध्ये तुरीची डाळ समावेश करू शकता आणि ते तुमच्यासाठी फायदेशीर आहे. तसेच तुरीच्या डाळीमध्ये पोषक घटकही जास्त प्रमाणात आहेत.

अनेकांना जळजळ होण्याची समस्या सारख्या जाणवत असतील तर तुम्ही तुरीच्या डाळीचे सेवन करू शकता. तसेच डाळीच्या सेवन केल्यास जळजळ होणे हे त्रास कमी होते. तर पाईल्सची समस्या असेल तर तुम्ही तुरीच्या डाळीचे सेवन करा.

# कशेणे येथे कालवा फुटल्याने शेती पाण्यात

## कडधान्याचे नुकसान; शेतकरी आक्रमक

**माणगाव : बातमीदार**

कशेणे गावचे हद्दीत मंगळवार दि. १७ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास कालवा फुटल्याने गावातील शेतकऱ्यांचे ४० ते ५० एकर जमिनीत लावलेले कडधान्य हे संपूर्णपणे पाण्याखाली गेले असून लाखो रुपयांचे नुकसान या शेतकऱ्यांचे झाले आहे.





सविस्तर वृत्त असे की, मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम हे कशेणे गावाजवळ चालू असून या महामार्ग लगत कालवा देखील लागून आहे. महामार्गाचे काम चालू असताना या कालव्याला मातीचा भराव करण्यात आला होता. कालव्याच्या पाण्याची पातळी वाढल्याने हा केलेला मातीचा भराव वाहून गेला व हे पाणी शेतीमध्ये शिरून शेतकऱ्यांच्या शेतातील मटकी, मुग, चवळी, हरभरे, तुर, वाल, भाजीपाला यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

शेतीचे नुकसान झाल्याने शेतकरी यांनी आक्रमक भूमिका घेऊन काळ प्रकल्प अधिकारी यांना बोलावून प्रकल्प अधिकाऱ्यांचे या कालव्याकडे दुर्लक्ष असल्याने महामार्गाचे काम चालू असताना हे कालव्याचे पाणी गावच्या शेतात गेले आहे. त्यामुळे नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली.

राष्ट्रवादी पक्षाचे नेते व भुवन सरपंच दीपकशेठ जाधव, उदय अधिकारी, संदेश मालोरे, मिलिंद खानविलकर, नंदकुमार गायकवाड तसेच बहुसंख्य शेतकरी, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते

**कालवा फुटल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू आहे. नुकसानभरपाई देण्याचा आम्ही प्रयत्न करू**

**–स्वेता चिचूलकर, सहाय्यक कार्यकारी अभियंता, काळ प्रकल्प**

# नेरळ–कळंब राज्यमार्गावर कारचा अपघात; चालक बचावला

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ–कळंब राज्यमार्ग रस्त्यावर पोशिर गावाजवळ आज सकाळी चार चाकी वाहनाला अपघात झाला. भरधाव वेगाने जाणाऱ्या एका अलिशान कारचा ताबा सुटल्याने गाडी थेट झाडावर आदळली. या भीषण धडकेत गाडीच्या दर्शनी भागाचा अक्षरश चक्काचूर झाला आहे. मात्र सुदैवाने गाडीतील एअरबॅग्स वेळेवर उघडल्याने चालक आणि त्यांच्यासोबत असलेली महिला थोडक्यात बचावले असून त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे.



घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार ह्युंदाई अल्काझार ही गाडी नेरळकडून कळंबच्या दिशेने जात होती. प्रवासादरम्यान चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. ताबा सुटलेली ही गाडी डाव्या बाजूने थेट उजव्या बाजूला गेली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या एका झाडाला जोरात धडकली. धडक इतकी जबरदस्त होती की गाडीच्या इंजिनचा भाग पूर्णपणे दबला गेला होता आणि त्यामुळे वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे.

हा अपघात घडला तेव्हा गाडीचा वेग जास्त असल्याने मोठा अनर्थ ओढवला असता. मात्र गाडीच्या एअरबॅग्स तात्काळ उघडल्या गेल्या. यामुळे गाडीतील चालक आणि सोबत असलेल्या महिलेला गंभीर दुखापत झाली नाही. केवळ किरकोळ जखमांवर दोघेही बचावले आहेत. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. तसेच रस्त्याच्या मध्यभागी असलेली गाडी स्थानिक वाहन चालक यांच्या साहाय्याने बाजूला काढण्यात आली. जखमी चालक आणि महिलेला तातडीने कळंब येथील सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर आहे. या अपघातामुळे नेरळ–कळंब रस्त्यावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

# आज खारेपाटात पाण्यासाठी धोंडबा आंदोलन

**पेण : प्रतिनिधी**

खारेपाट भागातील पिण्याच्या पाणी प्रश्नासाठी १८ फेब्रुवारी रोजी खारेपाट विभाग विकास संकल्प संघटनेच्या माध्यमातून पेण येथील महात्मा गांधी मंदीर ते पेण प्रांत कार्यालय येथे असंख्य महीला व पुरुषांसह धोंडबा आंदोलन करण्यात येणार आहे.



हेटवणे धरण हाकेच्या अंतरावर असताना पेण तालुक्यातील वाशी–शिर्की खारेपाटातील जनता गेल्या आठ वर्षांपासून तीन दिवसाआड पाणीपुरवठा सहन करत आहे. या धरणातून पिण्याचे पाणी नवी मुंबईला २४ तास पुरवठा होतो आणि या धरणावर प्रथम अधिकार असलेल्या खारेपाट भागातील नागरिकांना पाणी मिळत नाही.

आता यापुढे तेच पाणी खारेपाटाला सात दिवसाआड मिळणार आहे. कोट्यवधी रुपये खर्चुन योजना पुर्ण झाली, पाणी मुबलक आणि विपूल आहे, तरीही शेवटच्या गाव–वाड्यांमध्ये आजही पावसाचे साठवलेले अशुद्ध पाणी पिण्याची वेळ आहे.

हेटवणे धरणात वाशी–शिर्की खारेपाटासाठी गरजेपेक्षा अडीचपट अधिक पाणी उपलब्ध असुन सुद्धा दररोज पाणी न देता, पिण्याचे पाणी तीन दिवसांत विभागून दिले जाते. म्हणजे ही टंचाई नैसर्गिक नाही, तर नियोजनाच्या अभावातून निर्माण करण्यात आलेली कृत्रिम पाणीटंचाई आहे. हे आंदोलन, ही लढाई पाण्यासाठी, आपल्या आरोग्यासाठी आपल्या सुकर भविष्यासाठी, दररोज, मुबलक आणि शुद्ध पाण्यासाठी. आपल्या मूलभूत हक्कासाठी आहे.

कोकणात एक पूर्वजांपासुन चालत आलेली प्रथा आहे की पाऊस पडला नाही कीवा पिण्याच्या पाण्याची कमतरता आली की येथील ग्रामस्थ रात्री अंगाला झाडे पाने लावुन गावभर नाचत गात धोंडबा काढत व त्यानंतर थोडे पाणी मंदिरात नेऊन ओततात.

योगायोगाने कींवा दैवी चमत्कार पाऊस पडायचा. म्हणून या आंदोलनाला धोंडबा आंदोलन नाव दिले आहे.

# खोपोलीतील वीरेश्वर शिवमंदिरात महाशिवरात्री सोहळा उत्साहात

**खालापूर : प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे विरेश्वर ग्रामस्थ वरची खोपोली यांच्या वतीने पेशवेकालीन शिवमंदिरात भव्य अशा महाशिवरात्री निमित्त विविध धार्मिक सामाजिक आरोग्य व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवसीय कार्यक्रमा दरम्यान मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाला.

महीलांचे आजार व उपचार, यांवर तज्ञ डॉक्टरांनी तपासणी करून उपचार करण्यासाठी मार्गदर्शन केले. तसेच नेत्र तपासणी व उपचार रक्त तपासणी, तसेच आहार तज्ञांनी मार्गदर्शन केले. सोमवारी रात्री ८ ते १० या कालावधीत झि मराठी फेम राष्ट्रीय किर्तनकार हभप ऋतीका दीदी कदम यांचे सुश्राव्य कीर्तन झाले . यावेळी माजी नगराध्यक्ष दत्तात्रय मसुरकर, नगरसेवक विनायक तेलवणे, मनेष यादव, विकास जोशी मयूर रेटरेकर, संदेश येवले, विनोद राजपूत रमेश रेटरेकर व जनसमुदाय उपस्थित होता. अन्नदान महाकाला झाला.




### जाहीर नोटीस

सत्यमेव को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. इमारतीमधील सचिव सोसायटीच्या तळमाळ्यावरील फ्लोरींगच्या कामासाठी सिलबंद निविदा/दरपत्रके नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहेत. सदरील सीलबंद निविदा/दरपत्रके ह्या दिनांक २४/०३/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत कार्यालयात सादर करावयाच्या आहेत. त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

पोस्टाने सिलबंद निविदा पाठविल्यास व सदरील निविदा सोसायटीस वेळेवर पोहोच न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहिल. उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. तसेच त्यांचे तक्रारीचा विचार केला जाणार नाही अथवा अशी जबाबदारी सोसायटीची असणार नाही

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | सत्यमेव को. ऑप. हौसिंग सो. लि. इमारतीच्या तळमाळयावरील सर्व जागेच मधील फ्लौरीगचे काम करणे. अस्तित्वात असलेल्या सर्व लाद्या काढणे, खाली असलेल्या दगडापर्यत असलेली माती/रेती काढणे. त्यानंतर रेती, सिमेंट, खडी याचा थर देणे, व योग्य प्रकारे लेव्हल करणे. त्यानंतर सिमेंट कच टाकून मंजूर केलेल्या टाईल्स् बसविणे. कॉक्रीट: सिमेंट १ बॅग X रेती ६ बॅग X खडी –३ घमेला X कच | Lump sum | रु. |
| | अक्षरी रु. | | रु. |

को–या निविदा विकण्याचा कालावधी दिनांक : १३/०३/२०२६ ते १५/०३/२०२६ १०.०० ते १२.०० पर्यत को–या निविदेची किंमत रु. १०००/– (ना परतावा ) इसा–याची रक्कम: रु. १०,०००/– Demand Draft व्दारे पूर्ण भरलेल्या निविदा सोसायटीमध्ये सादर करण्याचा दिनांक : २४/०३/२०२६ दुपारी १२.०० पर्यत. निविदा उघडण्याचा दिनांक: २४/०३/२०२६ संध्याकाळी ५.०० वाजता शक्य झाल्यास.

एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा हक्क खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/–**
**सचिव,**
**सत्यमेव को.ऑप. हौसिंग सो.लि.**

**प्लॉट नं ८. सेक्टर नं ४, कंळबोली, नवी मुंबई–४१०२१८.**


# शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत प्रथम फाउंडेशन व महानगर गॅस प्रा. लि. यांच्या सहकार्याने सोमवारी (दि. १६) अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी हॉल येथे जिल्ह्यातील केंद्रप्रमुख, शिक्षक, गटशिक्षण अधिकारी, विस्तार अधिकारी यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.



या कार्यशाळेसाठी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, शिक्षणाधिकारी प्राथमिक ललिता दहितुले, उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, विस्तार अधिकारी कल्पना काकडे, निपुण महाराष्ट्र जिल्हा समन्वयक क्षमा खेडेकर, जिल्हा समन्वयक निनाद नागले, प्रथम फाउंडेशनचे राज्य कार्यक्रम प्रमुख शंकर पौळ यांच्यासह एकूण १७० केंद्रप्रमुख, शिक्षक व गटशिक्षण अधिकारी कार्यशाळेसाठी उपस्थित होते. रायगड जिल्हा परिषदेमार्फत शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत प्रामुख्याने ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि डिजिटल शाळा, पायाभूत सुविधा, व नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींवर लक्ष केंद्रित केले जात आहे. आधुनिक अध्यापन पद्धती आणि तंत्रज्ञानाचा वापर याबाबत शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी सोमवारी अलिबागमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

राजिपच्या इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची भाषा व गणित या विषयाच्या घेण्यात आलेल्या परीक्षेच्या प्रगतीचा आलेख यावेळी सादर करण्यात आला व विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्याच्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर शिक्षक, केंद्रप्रमुखांना आधुनिक अध्यापन पद्धतींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने भाषा व गणित या अंतर्गत येणा–या सर्व विषयांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची गुणवत्ता व आकलन क्षमता वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, याबाबत चर्चा करून योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले.

ओपन लिंक फाउंडेशन (विनोबा) यांच्यामार्फत समन्वयक वैभव शिर्के यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यानंतर शिष्यवृत्ती सराव परीक्षा व गुणवत्तेसाठी चांगले काम करणा–या एकूण ११ शाळा तसेच 'पोस्ट ऑफ मंथ' ठरलेल्या ७ शिक्षक व ३ केंद्रप्रमुखांचा यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# पेण येथे पीकपमधील लोखंडी पोलमुळे दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावरील पेण येथील अपघातांची मालिका सुरूच असून सोमवारी सकाळी अकराच्या सुमारास मोटारसायकल आणि पिकअप यांच्यात झालेल्या अपघातात मोटार सायकलवरील एकाचा मृत्यू झाला आहे.

शिवदास पुंडलिक पाटील हे त्यांच्या ताब्यातील स्प्लेंडर मोटारसायकलने पेण दादरहून येत असताना सकाळी अकराच्या सुमारास हॉटेल मुंबई मसाला समोरील मुंबई गोवा लेन वरून पेणकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडने पेणकडे उतरताना समोरून येणारा पिकअप चालकाने पीकअप रोड खाली उतरवल्याने सदर पिकअप मधील लोखंडी पोलची फिर्यादी यांचे वडील पुंडलिक नथुराम पाटील (वय ७५) रा. रामवाडी, समर्थ नगर पेण यांच्या डोक्याला धडक लागून दुखापत झाल्याने अपघाती मृत्यू झाला आहे.

याबाबतचा पुढील तपास पेण पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई विक्रम नवरखेडे करीत आहेत.


### कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल

**पाहिजेत**

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या ४ + १ शाखा असून ८० कोटींचा मिश्र व्यवसाय आहे. त्याकरीता खालील पदाकरींता अनुभवी (कर्मचारी/अधिकारी) यांची आवश्यकता आहे.

**इच्छुक उमेद्वारांनी जाहिरातीपासून १५ दिवसात आपले अर्ज खालील पत्त्यावर पाठवावेत.**

१) अकाउंटंट (पद संख्या २) शैक्षणिक पात्रता बी.कॉम / एम.कॉम.

- सहकारी बँका/पतपेढी मधील किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक
- जी.एस.टी., आय.टी व इतर टॅक्सेशन चे ज्ञान असणे आवश्यक
- कॉम्प्यूटरचे व अकौउंटिंगचे स्वतंत्र काम करणे आवश्यक
- पगार, पात्रता व अनुभव या नुसार ठरविण्यात येईल.

**सही/–**
**अध्यक्षा**

पत्ता :– कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल, ६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिरा शेजारी, टिळक रोड, पनवेल, जि. रायगड–४१०२०६. मोबा. नं. ८०८२५५५४०८/८४२५८९५६७५


## केळकर विद्यालयात नशामुक्ती अभियान

**अलिबाग :** चिंतामणराव केळकर विदयालयात नुकतेच नशामुक्त भारत अभियान अंतर्गत जनजागृती मोहिम राबविण्यात आली. या कार्यक्रमात पोलीस अधिक्षक नरेसर व सुहास तावडे यांनी नशामुक्तीबाबत मार्गदर्शन केले. अंमली पदार्थाच सेवन मानवी जीवनात कसे घातक आहे याबाबत माहिती दिली. अंमली पदार्थ सेवन करण्याची कारणे ज्याचे होणारे दुष्परिणाम विदयाथ्याना पटवून दिले. कार्यक्रमाची सांगता भारताला नशामुक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून शपथ बोलून घेतली.


### शुद्धीपत्रक

दि.१४/०२/२०२६ रोजीच्या रामप्रहर वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या कुलस्वामी को. ऑप क्रेडिट सोसायटीच्या जाहिर नोटीस मध्ये प्रतिवादीची थकीत कर्जाची रक्कम नजर चुकीने रूपये ७२,७८५ अशी छापली गेली होती त्याऐवजी ती रूपये ७१,१४६ रूपये अशी वाचावी.

**सही/–**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क – हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **७ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे आंबे तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड,**

| सर्व्हे नं. गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | क | ०-१७-९० पो.ख. ०-०२-९० एकूण क्षे. ०-२०-८० | ०.०३ | श्री. सेरा सुनिल सम्युल |
| वरील **एकूण क्षेत्र ० – २० – ८० हे. आर. पॉ.** पैकी सेरा सुनिल सम्युल यांचे अविभक्त हिश्याचे **एकूण क्षेत्र ० – ०८ – ०० हे. आर. पॉ., आकार ०.०१ रू. पैसे** | | | | |

पनवेल.
दिनांक : १७/०२/२०२६.

**सही/–**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-26/25-26 **RFX 7000038641 ...3rd call** | Supply of L-shape Table, File Rack, Midback Wheel chair and chairs without wheels required at various locations under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 4,13,775.39 |

EMD 1 % of estimated cost. Tender Fee: **Rs. 500/- + GST.** Submission of bids from **17.02.2026 to 27.02.2026 up to 11:00 hrs, Opening date: 27.02.2026 @ 11:30 Hrs.**

For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm),
Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**



### महाराष्ट्र शासन

**जिल्हा शासकीय रुग्णालय, रायगड-अलिबाग**
**अलिबाग-४०२ २०१.**
Emai ID: csraigad70@gmail.com

**ई-निविदा सुचना**

जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड–अलिबाग हा जिल्हा रुग्णालय अलिबाग अधिपत्याखालील उपजिल्हा / ग्रामीण रुग्णालयाकरीता महाड येथे Digital Mammography machine खरेदी करणे व जिल्हा क्षयरोग प्रतिबंधक औषधे प्रयोगशाळा साहित्य, किटस व मशीन कन्झुमेबल्स याची खरेदी करण्या करीता खरेदीसाठी ई निवीदा मागविणे बाबतची जाहीरात वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करावी.

जिल्हा शल्यंचिकित्सक, रायगड अलिबाग हे जिल्हा रुग्णालय अलिबाग अधिपत्याखालील उपजिल्हा/ग्रामीण रुग्णालयाकरीता महाड येथे Digital Mammography machine खरेदी करणे व जिल्हा क्षयरोग प्रतिबंधक औषधे प्रयोगशाळा साहित्य, किटस व मशीन कन्झुमेबल्स याची खरेदी पुरवठा करण्यास इच्छुक असलेल्या /निविदा धारकांना निविदेतील अटि व शर्ती, निविदा संदर्भात वेळापत्रक इ. माहिती शासनाच्या Website :- gem.gov.in वर उपलब्ध होतील. प्रस्तुत निविदा मान्य करण्यांचा अथवा कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा अमान्य करण्यांचा अधिकार खाली स्वाक्षरी करणा–या अधिका–याने राखून ठेवला आहे.

**सही/–**
**जिल्हा शल्यचिकित्सक,**
**रायगड अलिबाग**

आरओसी–२०२५–२६/क्र.–५/सी५९४९

# शिबिरात समाजसेवेचे 'श्रमसंस्कार'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा स्पोर्ट्‌स अकॅडमी बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्‌स, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स, पनवेलच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराने समाजसेवेचा अनोखा आदर्श उभा केला. ८ ते १४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान शांतीवन येथे हे शिबिर उत्साहात झाले.

या शिबिरामध्ये स्वच्छता मोहिम, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, जनजागृती कार्यक्रम, पथनाट्य, शैक्षणिक मदत, तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले.

शिबिराचे उद्‍घाटन मा. डॉ. शिवदास कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. कल्पेश भोईर व प्रा. मयुरी मॅडम उपस्थित होते. तसेच उमरोली गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि शांतीवन संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. शिबिरादरम्यान दररोज सकाळी योग प्रशिक्षण व श्रमदान, तर दुपारी बौद्धिक व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. सोमवारी भाषाशास्त्र, युवक प्रबोधन या विषयावर भागवताचार्य ह.भ.प.महेश महाराज यांच्या प्रभावी व्याख्यानाने विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. मंगळवारी राष्ट्रभावनेतील युवकांची भूमिका या विषयावर प्रा. आकाश पाटील यांनी मार्गदर्शन केले. बुधवारी राष्ट्रीय सेवा योजनेचे व्यक्तिमत्व विकासातील योगदान या विषयावर डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. गुरुवारी शिवराय यशाचा महामंत्र या विषयावर प्रा. अभिजित पाटील यांनी ऐतिहासिक दृष्टिकोनातून विचार मांडले.



### समारोपावेळी विद्यार्थ्यांच्या योगदानाचे कौतुक

शिबिराचा समारोप १४ फेब्रुवारी शनिवार रोजी प्रा. प्रशांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या यशस्वी उपक्रमाचे संपूर्ण नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. चंद्रकांत मुकादम व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. तसेच प्रा. के. डी. शारा, प्रा. अंजू सोखला आणि महाविद्यालयातील इतर प्राध्यापकांनी शिबिराला भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शुक्रवारी ग्लोबल वॉर्मिंग या ज्वलंत विषयावर प्रा. उमेश शिंदे यांनी पर्यावरण जनजागृतीचे महत्त्व पटवून दिले. तेजल खेडकर हिने अंधश्रद्धा निर्मूलन यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या सात दिवसांत चर्चासत्रे, परिसंवाद, कराटे प्रशिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि दैनंदिन लेखन यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी व सेवाभाव अधिक दृढ झाला. स्वयंसेवकांनी मनोगत व्यक्त करत या शिबिरामुळे आत्मविश्वास आणि संघभावना वाढल्याचे सांगितले.

# हिंदी दी चादर : नवी मुंबईत राष्ट्रीय ऐक्याचे संदेश प्रसारण



**नवी मुंबई : बातमीदार**

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी निमित्त नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रभातफेरी, निबंध, चित्रकला, वक्तृत्व, घोषवाक्य असे विविध उपक्रम राबविले जात आहेत. यासोबतच सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये सुप्रसिध्द गायक सतिंदर सरताज यांचे समर्पित भक्तीगीत श्रवण आणि डॉक्युमेंटरी मधून श्री गुरू तेग बहादुर साहिब यांचे तेजोमयी जीवनचरित्र दर्शन असे विविध उपक्रम राबविले जात आहेत.

या अंतर्गत १० फेब्रुवारीपासून विविध उपक्रम राबविण्यास सुरूवात झालेली असून नमुंमपा शाळा क्र. ४९ ऐरोली गाव तसेच पीएम श्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय शाळा क्र. ५५ आंबेडकरनगर रबाळे याठिकाणी हिंद की चादर हा चरित्रपट प्रदर्शित करण्यात आला तसेच सतिंदर सरताज यांनी गायलेले सुश्राव्य भक्तीगीतही प्रदर्शित करण्यात आले.

ऐरोली शाळेमध्ये बाबा विक्रमजितसिंग, तेजिंदरसिंग, मुखविंदरसिंग. दारासिंग, जसपाल सिंग या मान्यवरांनी उपस्थित राहून गुरूंच्या कार्याची महती सांगितली तसेच शहिदी समागम कार्यक्रमाचे महत्व विद्यार्थ्यांना कथन केले.

नमुंमपा शाळा क्र. ९२ कुकशेतगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी परिसरात प्रभातफेरी काढून घोषणांव्दारे तसेच घोषणा फलकांव्दारे कार्यक्रमाचे महत्व जनमानसात प्रसारित केले.

नेरूळ प. येथील नमुंमपा शाळा क्र. ९, सेक्टर १५ कोपरखैरणे येथील अस्मिता विशेष शाळा, सेक्टर ३ ऐरोली येथील श्रीराम विद्यालय, तुर्भे स्टोअर येथील नमुंमपा शाळा क्र. २२ याठिकाणी आयोजित चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित निबंध स्पर्धा यशस्वीरितीने संपन्न झाली. तसेच रा.फ.नाईक विद्यालय खैरणे बोनकोडे, नमुंमपा शाळा क्र. २२ तुर्भे स्टोअर आणि गुरू गोविंदसिंह एज्युकेशन अकॅडमी नेरूळ याठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतही विद्यार्थी उत्स्फुर्तपणे सहभागी झाले.

एसजी पब्लिक स्कुल घणसोली यांनी घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन केले होते. शिक्षण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांनी जारी केलेल्या परिपत्रकानुसार हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय ऐक्याचा संदेश शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी जनमानसात प्रसारित करीत आहेत.



**पनवेल : वडघर गावातील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची साठवण टाकी जागेसहित बांधून देण्यात यावी यासाठी आमदार महेश बालदी यांच्या पाठपुराव्याने आणि मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत प्रशासन, ग्रामस्थ आणि महिलांनी पुढाकार घेत सिडको भवन येथे प्रत्यक्ष जाऊन अधिकाऱ्यांची भेट घेऊन आढावा घेतला. या वेळी माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, समीना साठी, श्वेता पवार, वर्षा म्हात्रे, चंद्रकांत कांबळे, बशीर खान, सलीम शेख, सब्बीर कल्याणकर, वसीम सय्यद, प्रकाश डाकी, मुकेश कांबळे आदी उपस्थित होते.**

# क्रांती दिनानिमित्त अभिवादन सभेच्या पूर्वतयारीची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

येत्या २० मार्च रोजी होणाऱ्या क्रांती दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या अभिवादन सभेच्या पूर्वतयारीची बैठक स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक महाड येथेमहाड तालुका अध्यक्ष सुजित जाधव यांच्या निवासस्थानी घेण्यात आली.



या बैठकीला रायगड जिल्ह्याचे कार्याध्यक्ष विजय धोत्रे, रायगड जिल्हा संघटक राजेश हॉटे, माणगाव तालुका अध्यक्ष नितेश हाटे, श्रीवर्धन तालुका अध्यक्ष सुयोग लोखंडे, पेण तालुका अध्यक्ष अमित कांबळे, रोहा तालुका अध्यक्ष संतोष कवितकर, पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे, पनवेल शहराध्यक्ष प्रशांत सोनवणे, पेण तालुका अध्यक्ष अमित कांबळे, पनवेल तालुका संघटक मयूर गायकवाड महाड शहराचे अध्यक्ष सुनील जाधव महाड तालुका कार्यकारिणी व महाड शहर कार्यकारणीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या अभिवादन सभेची संपूर्ण जबाबदारी ही महाड तालुका अध्यक्ष सुजित जाधव यांच्यावर सोपवण्यात आलेली आहे. या सभेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पक्षाचे अध्यक्ष सागर भाई संसारे आदी उपस्थित राहणार आहेत. ही अभिवादन सभा यशस्वी करण्याकरता आवश्यक असलेले सहकार्य महेश साळुंखे व रायगड जिल्हा कार्यकारणी देणार आहे. या संबंधीची पुढील चर्चा करण्याकरता बैठक ४ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.

# कवयित्री शैलजा करोडे यांना पुरस्कार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई (मूळगाव-जळगाव खान्देश) येथे वास्तव्यास असलेल्या प्रसिद्ध लेखिका व कवयित्री शैलजा करोडे यांना त्यांच्या प्रदीर्घ व भरीव साहित्य सेवेबद्दल ' साहित्य भूषण २०२६' या प्रतिष्ठित पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.



हा पुरस्कार दिशा महाराष्ट्राची या लोकप्रिय यूट्यूब चॅनेलच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भवन, सानपाडा नवी मुबई येथे आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. महाराष्ट्रातील साहित्य क्षेत्रासाठी दिला जाणारा हा मानाचा सन्मान मानला जातो. शैलजा करोडे यांनी आपल्या लेखनातून समाजातील विविध प्रश्न, मानवी संवेदना, नातेसंबंध, स्त्रीजीवन, सामाजिक वास्तव तसेच माणुसकीच्या मूल्यांचा सखोल वेध घेतला आहे.

शैलजा करोडे यांची एकूण २६ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. या पुरस्कारामुळे जळगाव, नवी मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातील साहित्य प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण असून साहित्यिक, वाचक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शैलजा करोडे यांचे अभिनंदन केले जात आहे.

# देऊळवाडी येथे महाशिवरात्री उत्साहात

**उरण : बातमीदार**

हिंदू धर्मातील पवित्र सणापैकी महाशिवरात्री हा पवित्र सण मानला जात असून या दिवशी भगवान शिवाची मोठ्या प्रमाणात सर्वत्र पूजा,अर्चा, आराधना केली जाते. उरण शहरातील ऐतिहासिक व धार्मिक दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या देऊळवाडी येथील श्री क्षेत्र संगमेश्वर देवस्थान (श्री शंकर मंदिर) येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्री उत्सव मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

पहाटे २ ते ४ या वेळेत शिवभक्त गोवारी कुटुंब यांच्या हस्ते महारुद्र अभिषेक, सकाळी १० वाजता श्री गजानन प्रासादिक भजन मंडळ बोकडविरा यांचे भजन, सकाळी



११ वाजता श्री साईबाबा मंदिर चार फाटा उरण येथून येणाऱ्या सर्व साई भक्तांचे स्वागत, दुपारी ३ वाजता वारकरी संप्रदाय मंडळ पंचक्रोशी उरण यांचे कीर्तन त्यानंतर इंचगिरी सांप्रदाय गुरुभक्त वारकरी मंडळ उरण परिसर यांचे कीर्तन संपन्न झाले. या कीर्तनात ह भ प राजेंद्र गुरुजी महाराज यांनी शिव भक्तांना, भाविक भक्तांना शिव भक्तीचे, कर्माचे महत्त्व सांगितले व उत्तम मार्गदर्शन केले.

उरण तालुक्यातील व तालुक्या बाहेरील भावीक भक्तांनी रांगेत उभे राहून शिस्तीने देव दर्शनाचा लाभ घेतला. या वेळी उपवासाचे नाश्त्याचे वाटप करण्यात आले. या वेळी भाविक भक्तांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी कोटनाका रेल्वे प्रकल्पग्रस्त संघटनेचे सचिव, सिडको प्रकल्पग्रस्त कार्यकर्ते, व्यावसायिक तथा सामाजिक कार्यकर्ते हेमदास वामन गोवारी यांनी सभा मंडप, साऊंड सिस्टिम, व विद्युत रोषणाई आदीची उत्तम व्यवस्था केली होती.

# आयुक्तांच्या नावे मागितले पैसे

**नवी मुंबई :** थेट गुन्ह्याऐवजी सायबर गुन्हे सध्या वाढीस लागले आहेत. त्याचा फटका सर्वसामान्यांना बसलेला असताना, आता प्रशासकीय अधिकारीदेखील यातून सुटलेले नाहीत. खुद्द नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे सायबर फ्रॉडचा बळी ठरले आहेत. आयुक्तांच्या नावे चक्क फोन करून पैसे मागितले जात आहेत. याबाबत नवी मुंबई पालिकेने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त मा.डॉ.कैलास शिंदे यांचे छायाचित्र व Kailash Shinde असे नाव असलेल्या मोबाईल नंबरवरून आर्थिक मदतीसाठी मागणी केल्याचे संदेश प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे.

# प्रा.डॉ. संदीप घोडके यांचा सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील गिनी प्लाझा सहकारी हौसिंग सोसायटीचे रहिवासी, संस्थापक अध्यक्ष व विविध सामाजिक - शैक्षणिक संस्थांमधील सक्रिय सहभागी प्रा. डॉ संदीप वि. घोडके यांचा सहकार भारती संघ या सहकार चळवळ क्षेत्रातील दिशादर्शकाच्या भूमिकेत असलेल्या महासंघाकडून सोसायटी व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रसार, प्रबोधन व पूर्ण केल्यानिमित्त कायदेविषयक सल्लागार परब वकील, पनवेल महानगर सहकार भारतीच्या अध्यक्षा त्रिवेणी सालकर आणि संतोष पोकळे यांनी डॉ संदीप घोडके यांना कौतुकास्पद कामगिरीनिमित्त सन्मानित केले.

डॉ. संदीप घोडके हे 'रयत'च्या विविध महाविद्यालयात प्रशासन, सहकार व राज्यशास्त्र विषयाचे अभ्यासक म्हणून कार्यरत आहेत.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.१७) सांस्कृतिक समिती, विद्यार्थी कल्याण मंडळ व विद्यार्थी सल्लागार मंडळाच्या संयुक्त विद्यमाने 'तृतीय वर्ष निरोप समारंभ - युफोरिया पार्टी' उत्साहात झाला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी आणि त्यांच्या महाविद्यालयीन प्रवासातील आठवणींना उजाळा देणे हा होता. कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व पुढील करिअरसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्य, गायन, नाट्यछटा आणि मनोरंजनात्मक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी विद्यार्थी कल्याण मंडळाने विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम आणि प्रेरणादायी संदेशांचे आयोजन केले होते, तर विद्यार्थी सल्लागार मंडळातील सर्व सदस्य यांनी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. काही विद्यार्थ्यांना त्यांच्या विशेष कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# 'केबीपी'मध्ये थॅलेसेमिया तपासणी शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये ११ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयातील आरोग्य व कल्याण समिती व जनकल्याण समिती ठाणे यांच्या वतीने थॅलेसेमिया जनजागृती व तपासणी शिबिराचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये थॅलेसेमिया आजाराबाबत जनजागृती करणे व प्रतिबंधासाठी लवकर तपासणीचे महत्त्व अधोरेखित करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमात पार्ले पॅथॉलॉजी लॅबोरेटरीच्या डॉ. मेधा शेटे यांनी थॅलेसेमिया आजाराची कारणे, प्रतिबंधक उपाययोजना व वेळेवर तपासणीचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या वेळी १८० हून अधिक विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली असून एकूण २८६ विद्यार्थ्यांनी या आरोग्य उपक्रमाचा लाभ घेतला.

प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे, समितीच्या चेअरमन डॉ. आश्विनी पांडे व समन्वयक लेफ्टनंट सारंग भागवत यांच्या उपस्थितीत सदर शिबिर यशस्वीपणे पार पडले.





**पनवेल : येथे येणाऱ्या शिर्डीतील साईबाबा पादुका दर्शन सोहळ्यासाठी सोमवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन दर्शन व पूजनाचे निमंत्रण देण्यात आले. या सोहळ्याला त्यांनी सपत्नीक दर्शन व पूजनासाठी यावे असे ट्रस्टचे पदाधिकारी रामलाल चौधरी, राम थदानी व साईसेवक संजय कदम यांनी सांगितले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले.**

# माणगावात साडेचार टन प्लास्टिक पिशव्या जप्त

## विक्री करणाऱ्या दुकानावर नगरपंचायतीची धाड

**माणगाव : प्रतिनिधी**

प्लास्टिक पिशव्यांवरील शासनबंदीची कठोर अंमलबजावणी करत माणगाव नगरपंचायतीने सोमवारी (दि.१६) दुपारी कचेरी रोड येथील पंकज जनरल स्टोअर्स या दुकानावर अचानक धाड टाकून सुमारे साडेचार टन प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या. या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून छोटे मोठे उद्योग धंदेवाले भाजी विक्रेते, फळ विक्रेते, मच्छी विक्रेते, व्यापारी व विविध विक्रेत्यांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले असून एकच खळबळ उडाली आहे.

माणगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. गेल्या अनेक वर्षांपासून संबंधित दुकानातून माणगावातील छोट्या-मोठ्या दुकानदारांना, भाजी विक्रेत्यांना, मच्छी विक्रेत्यांना तसेच विविध व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्यांचा पुरवठा हा व्यापारी करीत असल्याची माहिती नगरपंचायतीला मिळाली होती. त्यानुसार नियोजनबद्ध



छापा टाकून मोठा साठा जप्त करण्यात आला. शासनाने प्लास्टिक पिशव्यांवर स्पष्ट बंदी घातलेली असताना माणगावात मात्र दिवसाढवळ्या विक्री सुरू असल्याबाबत नागरिकांत तीव्र नाराजी पसरली होती.

माणगाव नगरपंचायतीने यापूर्वी वारंवार सर्व व्यापारी, दुकानदार व उद्योगधंदेवाल्यांना नोटिसा बजावून प्लास्टिक बंदीच्या सूचना तोंडी तसेच लेखी दिल्या होत्या. तरीही नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याने पत्रकारांनी वारंवार 'प्लास्टिक बंदी केवळ कागदावरच' असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध केल्या होत्या. प्लास्टिक पिशव्यांमुळे शहरातील गटारे तुंबून मच्छरांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पर्यावरणीय हानीसोबतच नागरिकांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे नगरपंचायतीने केलेली ही कारवाई नागरिकांच्या अपेक्षांना प्रतिसाद देणारी मानली जात आहे.

आगामी काळात बंदीची अंमलबजावणी अधिक कडक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आंबोली कालव्याचे काम प्रगतिपथावर

## रखडलेल्या कामाला दशकानंतर सुरुवात; लागवडीखालील क्षेत्र वाढणार असल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित


**मुरूड : प्रतिनिधी**

आंबोली धरण लघु पाटबंधारे प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालवा व डावा तीर कालव्याच्या दहा वर्षांपासून रखडलेल्या कामास अखेर सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. शेतकऱ्यांनी सहकार्य केल्यास पुढील खरीप हंगामानंतर उन्हाळी भातशेती धरणाच्या पाण्या वर पिकवता येईल अशी अपेक्षा शेतकरी वर्ग करीत आहे. परिणामी भात उत्पादन क्षेत्र वाढीस लागायला मदत होणार आहे.

मुरूड शहरालगत १० कि.मी. परिसरात अन्यत्र धरण नाही. नबाबकालीन गारंबी धरणातून आज ही गुरुत्व पद्धतीने पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना जिरायत शेतीवरच अवलंबून राहावे लागत आहे. धरण क्षेत्रात प्रचंड जलसाठा असूनही कालव्याअभावी दुपिकी पिकांपासून शेतकरीवर्ग वंचित आहे.

मुरूड तालुक्यात शेतकऱ्यांची जमीन धारणा खुपच कमी अर्थात काही गुंठ्यांमध्ये असल्याने शेतात विहीर काढण्याचा खर्च अल्प भूधारकांना परवडणारा नाही. म्हणून पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी जमिनी ओस ठेवल्याचे चित्र आहे. आंबोली कालव्यांचे रखडलेले काम पूर्ण झाल्यास सहाशे हेक्टरहून अधिक जमीन दुपिकी होणार असून, उन्हाळी भातशेती सोबत भाजीपाला, कडधान्य, उन्हाळी भुईमूग, कलिंगड, पपई, केळी आदी फळफळावळ घेणे शक्य होणार आहे.

दुग्ध व्यवसायासारखे पूरक उद्योग, कुक्कुट पालन, कृषी पर्यटन आदी उद्योग व्यवसाय



शेतकऱ्यांना करणे शक्य होणार असल्याने त्यांच्या आर्थिक स्थितीत बदल होणार आहे.

मुरूड तालुक्यामध्ये रब्बी हंगामामध्ये पाण्याची उपलब्धता कमी असल्याने उन्हाळी भाताचे पीक शेतकरी घेऊ शकत नाहीत. कारण भातपिकाला पाण्याची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते आणि रब्बी हंगामामध्ये मुरूड तालुक्यामध्ये पाण्याची कमतरता भासत असल्यामुळे उन्हाळी भाताचे पीक घेणे शक्य होत नाही. शेतकऱ्यांना कालव्यासाठी वापरात येणाऱ्या भूसंपादन केलेल्या जागेचा अधिकचा मोबदला मिळेल, अशा अपेक्षेत शेतकरीवर्ग आहे,

**शासनाचे नवीन कालवा धोरण काय आहे?**

बंदिस्त कालवा ज्या शेतजमिनीतून जाणार आहे, ती जागा पाच फूट खोल खणण्यात येणार असून,५०० एम एम चा बंदिस्त पाईप जमिनीत टाकण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे जागेचे काहीही नुकसान होणार नाही. म्हणून शासनाकडून या तीर कालव्यात अधिग्रहित केलेल्या जागेची नुकसान भरपाई शासन देणार नाही हे घोषित केले आहे. यामुळे काही ठिकाणी शेतकरी विरोध करू शकतात. मात्र यदाकदाचित शासकीय कामात अडथळा निर्माण केला, तर पोलिस यंत्रणेला पाचारण करून कालव्याचे काम पूर्ण करणार, अशी माहिती मिळत आहे.

> **नवीन सिंचन धोरणामुळे आंबोली प्रकल्पास १३ डिसेंबर २०२२रोजी द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे आणि बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे संकल्पन प्राप्त झाल्यामुळे निविदा कार्यवाही पूर्ण होऊन जलसिंचन पाइपलाइन टाकण्याचे काम प्रगतिपथावर आहे. साधारणपणे पुढील हंगामापासून रब्बी-उन्हाळी शेतीकरिता पाणी उपलब्ध होईल.**
>
> **-अरुण रोकडे, अभियंता, पाटबंधारे विभाग**

पाण्याचा थेट पुरवठा होतो आणि मुख्य लाईनमधून थेट शाखांना पाणी देता येते. वा विस्तार करणे सोपे जाते. शेतकऱ्यांनी तीर कालव्याच्या कामास सहकार्य करण्याचे आवाहन पाट बंधारे विभागाचे कनिष्ठ अभियंता अतुल अढळ यांनी सांगितले.

शेतीला जोडधंदा मिळेल आणि पाणी उपलब्ध झाल्यास भाजीपाला मोठ्या प्रमाणावर पिकवता येईल व महत्वाचे म्हणजे बेरोजगार स्थानिक युवक शेतीकडे वळतील आणि रोजीरोटीचा अशंतः प्रश्न सुटेल, अशी प्रतिक्रिया वाणदे येथील प्रगतीशिल शेतकरी तुकाराम पाटील यांनी व्यक्त केली.

### पाईपलाईन टाकण्यासाठी सहकार्याचे आवाहन

***मुरूड आंबोली तीर कालव्याचे काम सुरू करण्यात आल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. आंबोली उजवा तीर कालव्याची लांबी ७.१० किमी तर डाव्या तीर कालव्याची लांबी २.६४ किमी इतकी असून, आतापर्यंत उजवा तीर कालव्याचे काम तीन किमी पूर्ण झाले असुन डाव्या तीर कालव्याचे काम दोन किमी काम पूर्ण झाले आहे. शेतकऱ्यांनी उर्वरित पाईपलाईन टाकण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.***

# कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील गैरसोयीबद्दल पोलीस मित्र आक्रमक

## तहसीलदार यांना निवेदन सादर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि गोरगरीब रुग्णांसाठी उपजिल्हा रुग्णालय बांधण्यात आले आहे, मात्र १५ वर्षात या रुग्णालयात सुविधांची कमतरता कायम असून पोलीस मित्र संघटनेने रुग्णसेवाबद्दल असलेल्या गैरसोयी बद्दल आक्रमक भूमिका घेतली आहे. कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधा सुधारल्या नाहीत तर उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे.

कर्जत उपजिल्हा रुग्णालय याची उभारणी कर्जत तालुक्याच्या सर्व भागातून येणाऱ्या रुग्णांना सेवा मिळावी यासाठी करण्यात आली आहे, मात्र टाळू ठिकाण असलेल्या कर्जत शहरात असलेले उपजिल्हा रुग्णालय शोभेची वास्तू वाटत आहे. रुग्णांना आरोग्य सुविधा देण्यात हे रुग्णालय कमी पडत असून प्रशासकीय यंत्रणा देखील कोणत्याही समस्यांना गांभीर्याने घेताना दिसत



नाही. त्यामुळे भविष्यात या ठिकाणी अनेक सुविधा रुग्णांना मिळाव्यात यासाठी पोलिस मित्र संघटना पाठपुरावा करीत आहे. रुग्णालयातील सुविधा बाबत रमेश कदम यांनी डिसेंबर २०२५ मध्ये पत्रव्यवहार केला होता. पोलिस मित्र संघटनेचे कोकण अध्यक्ष असलेले कदम यांना प्रशासनाने त्याबाबत कोणतेही उत्तर दिले नाही.

संबंधित आरोग्य विभागाची चौकशी करावी आणि उपजिल्हा रुग्णालय संबंधित अधिकारी वर्गावर कारवाई करण्याची मागणी पोलीस मित्र संघटनेकडून कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्याकडे करण्यात आली. या हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय सुविधा मिळत नाहीत. तसेच अनेक प्राथमिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामध्ये हॉस्पिटलमध्ये आलेल्या रुग्णांना रुग्णालयात औषधे उपलब्ध नसल्याचे सांगून बहुतेक रुग्णांना बाहेरून औषधे आणायला सांगितले जातात. ज्येष्ठ नागरिकांना जाणीवपूर्वक फिटनेस सर्टिफिकेट वर जावक नंबर न टाकता सर्टिफिकेट दिले जात आहे आणि त्यामुळे जेष्ठांना पुन्हा फेऱ्या माराव्या लागतात.

रुग्णालयात सर्वत्र अस्वच्छता असून या ठिकाणी असलेले सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. कुपोषित बालकांसाठी २०२४ - २५ दोन वर्षात उपचार बंद आहेत. सुट्टीच्या दिवशी रुग्णांना तातडीची सेवादेखील मिळत नाही. अशा अनेक समस्यांवर पोलीस मित्र संघटना यांच्याकडून तहसीलदार यांना सूचित करण्यात आले आहे. या सर्व समस्या मार्गी लागल्या नाहीत तर काही दिवसांनी कर्जत उपजिल्हा रुग्णालयासमोर उपोषण केले जाईल, असा इशारा रमेश कदम यांनी दिला आहे.

# रेवदंडा ज्येष्ठ नागरिक संघाचा २४वा वार्षिक उत्सव उत्साहात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

राज्य व आतंराराज्य पुरस्कार प्राप्त रेवदंडा ज्येष्ठ नागारिक संघाचा २४वा वार्षिक उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

रेवदंडा येथील जेष्ठ नागरिक संघाच्या विरंगुळा केंद्रात बुधवार दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी सायकांळच्या सुमारास आयोजन करण्यात आले होते. या वेळी सभेचे अध्यक्षपद चाटर्ड अकाउंट संजय राउत यांनी भुषविले तर नवनिर्वाचीत जिल्हा परिषद सदस्य डॉ.सचिन राउळ, नवनिर्वाचीत नागाव पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी, तसेच रेवदंडा ग्रा.प.सरपंच प्रफुल्ल मोरे, कोरडे मॅडम, संस्थेचे मंडळ सदस्य सुरेश खोत, सुरेश पालकर तसेच रेवदंडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सुभाष चिटणीस, पदाधिकारी लता चिटणीस, सरोज वरसोलकर, शरद वरसोलकर,रमेश म्हात्रे आदीसह मोठया संख्येने जेष्ठ नागरिक संघाचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रकाश पाटील यांनी केले.

कार्यक्रमाचे सुरूवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली, त्यानंतर उपस्थित मान्यवराचे स्वागत ज्येष्ठ नागरिक रेवदंडा संस्थेचे अध्यक्ष सुभाष चिटणीस तसेच लता चिटणीस यांचे हस्ते श्रीफळ व पुष्पगूच्छ प्रदान करून करण्यात आले.

या वेळी विविध मान्यवरांनी उपस्थितांना संबोधीत केले, तत्पुर्वी दिवंगत जेष्ठाना व मान्यवर व्यक्तीना श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली. या वेळी नवनिर्वाचीत जि.प.सदस्य डॉ. सचिन राउळ यांनी विरंगुळा केंद्रातील मोडकळीस आलेले बेचेंस पुनस्यः नव्याने देण्याचे आश्वासन जेष्ठांना दिले.



# स्थलांतरित नवीन सह दुय्यम निबंधक कार्यालयाचे उद्‌घाटन

## नेरळमध्ये दस्त नोंदणीसाठी नागरिकांना दिलासा

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कर्जत-कल्याण राज्यमार्गावरील नेरळ ग्रामपंचायत हद्दीत कार्यरत असलेले सह दुय्यम निबंधक कर्जत-२ कार्यालय यापूर्वी एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर सुरू होते. नागरिकांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता हे कार्यालय आता त्याच परिसरात इमारतीच्या मागील बाजूस तळमजल्यावर स्थलांतरित करण्यात आले असून स्थलांतरित नव्या कार्यालयाचे उद्घाटन कर्जत विधानसभा आमदार महेंद्र थोरवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या वेळी कर्जत नेरळ-२ चे सह दुय्यम निबंधक अधिकारी विक्रांत आंबस्कर, जे.डी.आर. अमित शेडगे, ॲड. अहिरे, कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी, वकील तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

नेरळ शहर व परिसर झपाट्याने शहरीकरणाकडे वाटचाल करत असून लोकसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना शासकीय सेवा जवळ उपलब्ध व्हाव्यात यासाठी कार्यालयाचे स्थलांतर महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. सह दुय्यम निबंधक कार्यालयात जागा-जमिनींची खरेदी-विक्री व्यवहार, दस्त नोंदणी, करारनामे, मालमत्ता हस्तांतरण यांसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांची नोंद केली जाते. त्यामुळे दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. नव्या ठिकाणी कार्यालय सुरू झाल्याने नागरिकांचा वेळ वाचणार असून व्यवहार अधिक सुलभ व जलद होणार आहेत.

पूर्वी कार्यालय दुसऱ्या मजल्यावर असल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच आजारी व्यक्तींना जिने चढणे-उतरणे त्रासदायक ठरत होते. आता तळमजल्यावर कार्यालय आल्याने ही अडचण दूर झाली आहे. शासनाच्या धोरणानुसार दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी शासकीय कार्यालये ग्राउंड लेव्हलवर असणे आवश्यक असल्याची माहिती ॲड. अहिरे यांनी दिली. तसेच या कार्यालयासाठी लोकवर्गणीतून सहकार्य मिळाल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

नव्या ठिकाणी कार्यालय सुरू झाल्याने नागरिकांना दस्तऐवजांच्या नोंदणीसाठी अधिक सोयीस्कर सुविधा उपलब्ध होणार असून नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



# कर्जत येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा पुरस्कार सोहळा

**नेरळ : प्रतिनिधी**

पत्रकारांच्या हितासाठी कार्यरत असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, मुंबई यांच्या वतीने 'पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ' तसेच 'वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ' पुरस्कार वितरण सोहळा व अध्यक्षांचा मेळावा रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता रॉयल गार्डन, कर्जत-मुरबाड रोड, मुद्रे, ता. कर्जत, जि. रायगड येथे आयोजित करण्यात आला आहे.

रितेचा वारसा जपत समाजहिताची जाणीव ठेवून आदर्श कार्य उभारणाऱ्या जिल्हा व तालुका पत्रकार संघटनांचा गौरव व सन्मान करण्यासाठी हा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याचे संयोजन कर्जत प्रेस क्लब करीत आहे.

या सोहळ्यात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अभयजी आपटे (माजी अध्यक्ष, रायगड प्रेस क्लब) तसेच सेलू तालुका मराठी पत्रकार संघ, जि. परभणी यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. 'रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ' पुरस्कारासाठी परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ यांची निवड करण्यात आली आहे. तर 'वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ' पुरस्कारासाठी बेला तालुका मराठी पत्रकार संघ (जि. नागपूर), चामोर्शी तालुका मराठी पत्रकार संघ (जि. गडचिरोली), नांदगाव-मनमाड तालुका मराठी पत्रकार संघ (जि. नाशिक), पनवेल महानगर प्रेस क्लब (जि. रायगड), आंबेगाव तालुका मराठी पत्रकार संघ (जि. पुणे), किनवट तालुका मराठी पत्रकार संघ (जि. नांदेड), अंबाजोगाई तालुका मराठी पत्रकार परिषद (जि. बीड), संग्रामपूर तालुका मराठी पत्रकार संघ (जि. बुलढाणा), पलूस तालुका मराठी पत्रकार संघ (जि. सांगली) तसेच मुंबई उपनगर पत्रकार असोसिएशन, मुंबई यांची निवड झाली आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीरंग आप्पा बारणे (खासदार, मावळ लोकसभा मतदारसंघ), महेंद्र थोरवे (आमदार, कर्जत-खालापूर विधानसभा), किरण नाईक, शरद पावळे, मंदार फणसे (संपादक, न्यूज १८ मराठी), मिलिंद आष्टीवकर (अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद), शिवराज काटकर (कार्याध्यक्ष, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद) आदी उपस्थित राहणार आहेत.

तसेच विशेष उपस्थितीत माजी आमदार सुरेशभाऊ लाड, सुधाकर घारे (रायगड जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) प्रकाश संकपाळ (प्रांताधिकारी, कर्जत), राहुल गायकवाड (उपविभागीय पोलिस अधिकारी, कर्जत), नितीन सावंत (उपजिल्हाप्रमुख, शिवसेना णइढ), धनंजय जाधव (तहसीलदार, कर्जत), सौ. पुष्पा दगडे (नगराध्यक्ष, कर्जत नगरपरिषद), तानाजी चव्हाण (मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद), संतोष पाटील (उपनगराध्यक्ष, कर्जत नगरपरिषद), संकेत भासे (विरोधी पक्षनेता, कर्जत नगरपरिषद), जितेंद्र पाटील (अध्यक्ष, रायगड जिल्हा, मनसे), किरण ठाकरे (भाजपा नेते, कर्जत) तसेच ॲड. कैलास मोरे (सामाजिक कार्यकर्ते) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्याचे आयोजन अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, मुंबई यांच्या वतीने करण्यात आले असून संयोजन कर्जत प्रेस क्लब तसेच रायगड प्रेस क्लब यांच्या सहकार्याने करण्यात आले आहे.

# शांतीनगर येथे शिवणकाम प्रशिक्षण

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

ग्रामीण व शहरी भागातील महिलांना कौशल्याधारित प्रशिक्षणातून आर्थिक स्वावलंबनाची दिशा देण्याच्या उद्देशाने पहल नर्टरिंग लाईव्ह, खालापूर या संस्थेच्या माध्यमातून आणि विक्रम साबळे फाऊंडेशनच्या सहकार्याने खोपोली शहरातील शांतीनगर येथील साबळे अपार्टमेंटमध्ये १६ फेब्रुवारी २०२६ रोजी 'सखी स्टिचिंग क्लासेस' या शिवणकाम प्रशिक्षण उपक्रमाचा शुभारंभ उत्साहात झाला.

महिलांना केवळ पारंपरिक कौशल्य नव्हे, तर आधुनिक डिझाईन, उद्योजकता व स्वावलंबनाची दृष्टी देण्याचा संकल्प यावेळी पहल नर्टरिंग लाईव्ह कडून व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास



खोपोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन हिरे, खोपोली नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, आरोग्य सभापती मयुरी सिद्धांत शेलार, नगरसेविका सानिया मोहसीन शेख, वर्षा मोरे - ताराराणी ब्रिगेडच्या वर्षा मोरे, हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर तसेच पहल संस्थेचे रोहिदास राठोड व संदीप मोहिते हे पदाधिकारी उपस्थित होते.

संस्थेच्या वतीने प्रशिक्षणार्थींना आवश्यक साहित्य पुरविण्यात आले असून पुढील काळात उत्पादन विक्रीसाठी मार्गदर्शन, बाजारपेठेची जोड व स्वयंरोजगार संधी निर्माण करण्याचाही मानस व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन रेश्मा शाहीद शेख व शाहीद शाफि शेख यांनी केले. स्थानिक नागरिकांच्या सहकार्यामुळे हा सामाजिक परिवर्तनाच्या उपक्रमाचा यशस्वीरीत्या प्रारंभ झाला.

# सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक वितरण

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा-२०२५ स्पर्धेत जिल्हास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक संत रोहिदास तरुण विकास मंडळ, महाड (पारितोषिक रक्कमः ५०,००० रुपये), द्वितीय क्रमांक श्री युवा मित्र मंडळ, पनवेल, नवी मुंबई (पारितोषिक रक्कमः ४०००० रुपये), तृतीय क्रमांकः सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट, रोहा, रायगड (पारितोषिक रक्कमः ३०००० रुपये) यांचा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते गौरव व पारितोषिक वितरण कार्यक्रम झाला.

या वेळी अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सुर्यवंशी तसेच कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, राज्यातील सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत राज्यातील सर्वोत्कृष्ट सार्वजनिक



गणेशोत्सव मंडळांची निवड करण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धा पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या वतीने राबविण्यात आल्या होत्या.

कला व संस्कृतीः पारंपरिक कलांचे आयोजन आणि दुर्मीळ वस्तूंचे प्रदर्शन, सामाजिक कार्य महिला, पर्यावरण पूरक गणेशोत्सवः प्रदूषण विरहित परिसर, पर्यावरणपूरक सजावट निसर्ग जतन गडकिल्ले संवर्धन आणि स्वच्छतेबाबत केलेली जनजागृती या निकषांचा विचार करण्यात आला होता.

# श्रीलंकेची ऑस्ट्रेलियावर मात

## निसांकाचे शानदार शतक

**पल्लेकेले : वृत्तसंस्था**

झिम्बाब्वेपाठोपाठ श्रीलंकेकडून पराभव पत्करावा लागल्याने ऑस्ट्रेलियाचे ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील आव्हान धोक्यात आले आहे. दुशान हेमंताच्या (३७ धावांत ३ बळी) प्रभावी गोलंदाजीनंतर सलामीवीर पथुम निसांकाच्या (५२ चेंडूंत नाबाद १००) आक्रमक शतकी खेळीच्या जोरावर श्रीलंकेने 'ब' गटाच्या सामन्यात सोमवारी ऑस्ट्रेलियावर आठ गडी आणि १२ चेंडू राखून विजय मिळवला.



या विजयामुळे श्रीलंकेचे सुपर ८ फेरीतील स्थान निश्चित झाले असून ऑस्ट्रेलियाला आता इतर संघांच्या निकालावर अवलंबून रहावे लागेल.

ऑस्ट्रेलियाने दिलेल्या १८२ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करणाऱ्या श्रीलंकेची सुरुवात चांगली झाली नाही. कुशल परेराच्या (१) रूपात संघाला पहिला धक्का बसला. यानंतर मात्र निसांका व कुशल मेंडिस (३८ चेंडूंत ५१ धावा) यांनी संघाचा डाव सावरला. दोघांनी मिळून दुसऱ्या गड्यासाठी ९७ धावांची भागीदारी रचत संघाला शंभरी गाठून दिली.

मार्कस स्टोइनिसने मेंडिसला बाद करीत ही भागीदारी मोडीत काढली. दुसऱ्या बाजूने निसांकाने संघाची धावगती कमी होणार याची काळजी घेतली. त्याने यानंतर पवन रत्नायके (१५ चेंडूंत नाबाद २८) याच्यासह ७९ धावांची अभेद्य भागीदारी रचत श्रीलंकेला १८ षटकांतच विजय मिळवून दिला. निसांकाने आपल्या खेळीत १० चौकार व पाच षटकारांची आतषबाजी केली.

तत्पूर्वी प्रथम फलंदाजी करणाऱ्या ऑस्ट्रेलियाने आक्रमक सुरुवात केली. सलामीवीर कर्णधार मिचेल मार्श (५४) आणि ट्रॅव्हिस हेड (५६) यांनी पहिल्या गड्यासाठी १०४ धावांची भागीदारी केली. या दोघांच्या खेळावरून ऑस्ट्रेलिया २२५च्या पुढे मजल मारेल असे चित्र होते, मात्र तसे झाले नाही. सलामीची जोडी माघारी परतल्यानंतर जोश इंग्लिस (२७) व ग्लेन मॅक्सवेल (२२) वगळता इतर कोणत्याही फलंदाजाला प्रभाव पाडता आला नाही. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचा डाव १८१ धावांत संपुष्टात आला. श्रीलंकेने मैदानात चांगले झेल पकडले. यात निसांकाने मॅक्सवेलचा पकडलेला झेप लक्षवेधी ठरला.

# भारताचा अखेरचा साखळी सामना आज नेदरलँड्सविरुद्ध

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० विश्वचषक स्पर्धेतील पहिले तीनही सामने जिंकत भारतीय क्रिकेट संघाने स्पर्धेच्या सुपर ८ फेरीत मोठ्या दिमाखात प्रवेश केला आहे. आता भारतीय संघाचा चौथा साखळी सामना बुधवारी (दि. १८) नेदरलँडविरुद्ध होणार आहे. सुपर ८ फेरीतील स्थान आधीच निश्चित झाल्याने भारतीय संघ या लढतीमध्ये संघात काही प्रयोग करून पाहण्याची शक्यता आहे.

सुपर ८ फेरीत भारतीय संघाची गाठ वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका यासारख्या बलाढ्य संघांशी पडणार आहे. त्यामुळे या लढतींसाठीची तयारी म्हणून संघातील इतर खेळाडूंना नेदरलँडविरुद्धच्या सामन्यात आजमावून पाहिले जाण्याची शक्यता आहे. नेदरलँडचा संघ हा तुलनेने दुबळा असल्याने आणि या लढतीमधील निकालाचा गुणतक्त्यावर फारसा फरक पडणार नसल्याने या लढतीत भारतीय संघ काही बदलांसह खेळू शकतो.

यामध्ये जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पांड्या यांच्यासारख्या वरिष्ठ खेळाडूंना सुपर ८च्या लढतींपूर्वी विश्रांती दिली जाऊ शकते. बुमराह हा ताप आल्यामुळे अमेरिकेविरुद्धच्या लढतीत खेळला नव्हता, तर पांड्या तिन्ही सामन्यात खेळला आहे. सुपर ८ फेरीतील लढतीमध्ये हे दोन्ही खेळाडू भारतीय संघासाठी महत्त्वपूर्ण ठरणार

## टीम इंडिया करणार प्रयोग




आहेत. त्यामुळे बुधवारच्या सामन्यात ते खेळण्याची शक्यता कमी आहे.

नेदरलँडविरुद्धच्या सामन्यात जसप्रीत बुमराहऐवजी मोहम्मद सिराज याला संघात संधी मिळू शकते. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममधील खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल राहिली आहे. अशा परिस्थितीत सिराज आणि इतर गोलंदाजांची कसोटी लागणार आहे. याबरोबरच हार्दिक पांड्याला विश्रांती दिली गेल्यास त्याच्या अनुपस्थितीत शिवम दुबे याला डावाच्या सुरुवातीला गोलंदाजी दिली जाऊ शकते तसेच हार्दिक पांड्या न खेळल्यास रिंकू सिंह आणि अक्षर पटेल यांना फलंदाजीसाठी अतिरिक्त वेळ मिळू शकतो तसेच वॉशिंग्टन सुंदरलाही संघात संधी मिळू शकते.

# माणगावच्या उडान क्रीडा महोत्सवाला प्रतिसाद

## ३२५ विद्यार्थ्यांनी सहभागी होत दाखवले क्रीडा कौशल्य



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका क्रीडा संकुल येथे डी. एस. कुळकर्णी फाउंडेशन इंदापूर, ट्रॅक अँड बियॉन्ड मुंबई पुरस्कृत आणि कांश स्पोर्टिंग हब मुंबई आयोजित तालुकास्तरीय उडान क्रीडा महोत्सव उत्साहात पार पडला. या महोत्सवात माणगाव, तळा, महाड तालुक्यातील शाळा, स्पोर्ट्स क्लब यामधून ३२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

शाळांचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक आणि पालकवर्ग मोठ्या संख्येने मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थित होते. ८ ते १७ अशा वेगवेगळ्या वयोगटातील मुला-मुलींनी विविध मैदानी स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन क्रीडाशैलीचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

डी. एस. कुळकर्णी फाउंडेशनचे अमोल कुळकर्णी, ट्रॅक अँड बियॉन्ड मुंबईचे निलेश जाधव, कांश स्पोटिंग हब मुंबईचे नितीन सावंत, स्वप्नील देसाई, अमित पाताडे आणि एस.एस. निकम इंग्लिश स्कूल इंदापूरमधील शिक्षकांनी स्पर्धेचे नियोजन केले होते.

क्रीडा महोत्सवासाठी रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ, माणगाव तालुका क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर, क्रीडा मार्गदर्शक संजय गमरे यांचे सहकार्य लाभले.

## रणजी ट्रॉफी सेमी फायनलमध्ये शमीचे एकाच डावात आठ बळी

**कल्याणी : वृत्तसंस्था**

रणजी ट्रॉफीच्या उपांत्य सामन्यात मोहम्मद शमीने पश्चिम बंगालकडून खेळताना आठ बळी घेत संघाला विजय मिळवून दिला. या दमदार कामगिरीमुळे त्याला टीम इंडियात स्थान मिळण्याची शक्यता बळावली आहे.

शमीच्या विध्वंसक माऱ्यामुळे बंगालने सेमी फायनलच्या पहिल्या डावात जम्मू आणि काश्मीरला मागे टाकले. शमीने २२.१ षटके गोलंदाजी केली आणि ९० धावा देत आठ विकेट्स घेतल्या. शमीच्या या कामगिरीमुळे बंगालला पहिल्या डावात महत्त्वपूर्ण आघाडी मिळाली आहे. बंगालने आपल्या पहिल्या डावात ३२८ धावा केल्या होत्या, ज्यात सुदीप कुमार घरामीने १४६ धावांची शतकी खेळी केली होती. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५नंतर शमीला संघात स्थान मिळालेले नाही. आताच्या कामगिरीने त्याने आपण मोठ्या मालिकांसाठी पूर्ण तंदुरुस्त असल्याचे दाखवून दिले आहे.

# खोपोलीत बुद्धिबळ स्पर्धा रंगली




**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ खोपोली आणि डॉ. रामहरी धोटे शिशुमंदिर शाळेतील इंटरक्ट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने अकवी खुली आणि वयोगट रॅपिड बुद्धिबळ स्पर्धा खोपोलीत पार पडली. रायगड जिल्हा आणि महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना यांच्या अधिपत्याखाली झालेल्या या स्पर्धेत जिल्हा व राज्यातील नामवंत तसेच नवोदित बुद्धिबळपटूंचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

रामशेठ ठाकूर सभागृहात स्पर्धा रंगली. स्पर्धेचे उदघाटन माजी नगराध्यक्ष सुनील पाटील यांच्या हस्ते झाले. बुद्धिबळाच्या माध्यमातून विचारशक्ती, एकाग्रता व निर्णयक्षमता वाढीस लागावी या उद्देशाने ही स्पर्धा सातत्याने आयोजित केली जाते.

या स्पर्धेसाठी रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या अध्यक्ष सुनिता चव्हाण, सचिव डॉ. नलिनी रामास्वामी, कोषाध्यक्ष सुभाष अगरवाल, इंटरॅक्ट क्लब अध्यक्ष सई सावंत तसेच स्पर्धा संचालक मिलिंद बोधनकर, जितेंद्र देशमुख यांनी परिश्रम घेतले. बुद्धिबळप्रेमींनी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामने पहिले.

## क्रिकेट स्पर्धेत कळंब संघ विजेता



**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुक्यातील नागोठणेजवळील सुकेळी येथे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत केळजाई कळंब संघाने विजेतेपद पटकाविले.


स्पर्धेत अनेक संघांनी सहभाग दर्शवत प्रतिसाद दिला. स्पर्धेचे उद्घाटन ऐनघर ग्रामपंचायतीचे सदस्य विनोद निरगुडे यांच्यासह गणपतवाडी ग्रामस्थांच्या उपस्थितीत झाले. द्वितीय क्रमांक कासारवाडी संघ, तृतीय गणपतवाडी, चतुर्थ उसर ठाकूरवाडी, पाचवा वाडा आणि सहावा क्रमांक मुकडे संघाने प्राप्त केला.


स्पर्धेला शिवसेना उपतालुकाप्रमुख मनोज खांडेकर, ऐनघर ग्रामपंचायतीचे सदस्य विनोद निरगुडे, संजय कणघरे, यशवंत पवार, यांच्यासह ग्रामस्थ यशवंत वारगुडे, मालु शिद, जानू शिद, चंदू वारगुडे, अक्षय निरगुडे, प्रभाकर वारगुडे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. विजेत्या संघांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

# पाकिस्तानच्या पराभवानंतर शाहीद आफ्रिदी वरिष्ठ खेळाडूंवर भडकला

**कराची : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा सहज पराभव केला. या पराभवामुळे आता पाकिस्तान क्रिकेटमध्ये भूकंप आला





आहे. पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहीद आफ्रिदीने संघातील वरिष्ठ खेळाडूंना धारेवर धरले आहे. आफ्रिदीने आपला जावाई शाहीन शहा आफ्रिदीलादेखील सोडले नाही.

शाहीद अफ्रिदीने स्पष्टपणे सांगितले की, आता सतत अपयशी ठरणाऱ्या वरिष्ठ खेळाडूंना आराम देऊन युवा खेळाडूंना संधी दिली पाहिजे. त्याने बाबर आझम, शाहीन आफ्रिदी आणि शादाब खान यांना बेंचवर बसवण्याचा सल्ला दिला आहे. शाहीदच्या मते या खेळाडूंना सतत संधी मिळाली आहे, मात्र हे मोठ्या सामन्यात सतत अपयशी ठरत आहेत.

समा टीव्हीशी बोलताना शाहीद म्हणाला, जर मला निर्णय घ्यायचा असेल तर मी शाहीन, बाबर आणि शादाब या दिघांना बेंचवर बसवेन. नवीन खेळाडूंना संधी देईन. त्यांच्यावर विश्वास दाखवेन. नामिबियाविरूद्धच्या सामन्यात तरुण खेळाडूंना खेळवून त्यांना आत्मविश्वास देण्याची गरज आहे.

तो पुढे म्हणाला, आपण या खेळाडूंना इतक्या वर्षांपासून संधी देतोय. ज्या संघाविरूद्ध हे कामगिरी करणार अशी आशा असते त्या सामन्यात हे वरिष्ठ खेळाडू जर कामगिरी करू शकले नाहीत, तर त्यांना बेंचवर बसवून ज्युनिअर खेळाडूंना संधी देऊन त्यांना आजमावून पाहण्यात काय हरकत आहे.

शाहीनने शाहीद आफ्रिदीच्या मुलीशी अंशाशी २०२३मध्ये लग्न केले आहे. शाहीदचा जावई शाहीन आफ्रिदीची भारताविरुद्धच्या सामन्यात धुलाई झाली. या सामन्यात पाकिस्तानचा तो सर्वात महागडा गोलंदाज ठरला. त्याने दोन षटकात तब्बल ३१ धावांची लयलूट केली. डावाच्या शेवटच्या षटकात शाहीनने १६ धावा केल्या. यामुळे भारतीय संघ १७० धावांच्या पार गेला.

शादाब खानसाठीही हा दिवस चांगला नव्हता. त्याने एका षटकात १७ धावा दिल्या, तर फलंदाजीत तो १४ धावा करून बाद झाला. बाबर आझमदेखील फारसा प्रभाव टाकू शकला नाही.

## शोएब अख्तरचाही संताप

भारतीय संघाविरुद्धच्या लाजिरवाण्या पराभवानंतर 'रावळपिंडी एक्स्प्रेस' नावाने ओळखल्या जाणाऱ्या शोएब अख्तरने याने एका वृत्तवाहिनीवरील मुलाखतीमध्ये नाव न घेता पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष आणि पाकिस्तानी सरकारमधील मंत्री मोहसीन नक्वी यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थितीत केले आहे. एवढेच नव्हे तर त्याने अनुभवी आणि स्टार खेळाडूंनाही आरसा दाखवला आहे. अख्तर म्हणाला की, ज्यांना क्रिकेटचे ज्ञान नाही, ते पीसीबीचे चेअरमन झाले आहेत. अशा लोकांकडे जबाबदारी दिली तर संघाचे नुकसान होणारच. यावेळी त्याने पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमवरही सडकून टीका केली. ज्याला सुपरस्टार म्हटले जाते, तो एकही सामना जिंकवू शकत नाही. कर्तृत्वशून्य आणि अज्ञानी व्यक्तीला मोठी जबाबदारी देणे हा सर्वात मोठा गुन्हा आहे. अख्तरने फक्त क्रिकेट बोर्डातील प्रशासकांवर नाही, तर वरिष्ठ खेळाडूंवरही टीका केली. शाहीन आफ्रिदी आणि शादाब खान या अनुभवी खेळाडूंच्या कामगिरीवरही त्याने प्रश्नचिन्हे उपस्थित केले आहे.




**पनवेल : येथील सनी राजेश टाक याने अबुधाबीमध्ये झालेल्या जागतिक ओपन मास्टर स्विमिंग स्पर्धेत चौथा क्रमांक मिळविला. महापौर नितीन पाटील यांनी त्याचे अभिनंदन केले तसेच सनीची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्याला आगामी वाटचालीसाठी एक लाख रुपयांची मदत आपल्या जाणीव संस्थेमार्फत दिली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते गौतम पाटेकर, उमेश इनामदार आदी उपस्थित होते**

## युवराज सामराचे विश्वविक्रमी शतक

**चेन्नई** : टी-२० विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात कॅनडाचा सलामीवीर फलंदाज युवराज सामरा याने फक्त ५८ चेंडूत शतक झळकावले. १९ वर्षीय या भारतीय वंशाच्या फलंदाजाने या शतकी खेळीसह वर्ल्ड रेकॉर्ड नावे केला आहे.

युवराजने ६५ चेंडूत ११ चौकार व सहा षटकारांसह ११० धावांची खेळी केली. तो टी-२० विश्वचषक इतिहासात शतक करणारा सर्वात तरुण फलंदाज ठरला आहे. त्याने पाकिस्तानच्या अहमद शहजादचा विश्वविक्रम मोडला, ज्याने २०१४च्या टी-२० विश्वचषकात बांगलादेशविरुद्ध २२ वर्षे आणि १२७ दिवस वय असताना शतक झळकावले होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com